# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com

* वर्ष ६५ वे * अंक १८४ * नांदेड * रविवार, दि. १२ जुलै २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎ : 255777, Fax :252211


















## पावसामुळे कचऱ्याचा ढिग घसरला; ८ जणांचा मृत्यू

**पुणे (प्रतिनिधी)–** पिंपरी चिंचवडच्या मोशी परिसरातील महापालिकेच्या वेस्ट–टू–एनर्जी प्रकल्पात मुसळधार पावसामुळे कचऱ्याचा प्रचंड मोठा ढिगारा घसरुन प्रशासकीय इमारतीवर कोसळल्याने भीषण दुर्घटना घडली आहे. ही घटना बुधवारी घडली होती. दुर्घटनेनंतर ढिगाऱ्याखाली २३ जण अडकले होते. यातील १४ जणांना सुखरुप बाहेर काढण्यात यश आलं आहे. तर या घटनेत ८ जणांचा मृत्यू झाला आहे. हे मृतदेह बाहेर काढण्यात यळ आलं आहे. मात्र एक व्यक्ती बाहेरच्या कचऱ्याखाली दबला गेलाय. त्याचा शोध सुरु आहे.

मोशी दुर्घटनाग्रस्त इमारतीतून ८ मृतदेह बाहेर काढण्यात यश आलं आहे. इमारतीतील रेस्क्यू ऑपरेशन संपलं आहे. मात्र एक व्यक्ती बाहेरच्या कचऱ्याखाली दबला आहे. त्याचा शोध सुरु असल्याची माहिती पालिका आयुक्त विजय सुर्यवंशींनी दिली आहे.

## भारतीय प्रवाशांची बोट उलटून व्हिएतनाममध्ये १५ पर्यटकांचा मृत्यू

**मुंबई (प्रतिनिधी)–** व्हिएतनाममधील फु क्कोक द्वीप परिसरात भारतीय पर्यटकांना घेऊन जाणारी एक स्पीडबोट समुद्रात उलटली. या भीषण अपघातात १५ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ओशन पियर आइलैंड कंपनीची एक स्पीडबोट पर्यटकांना घेऊन होन में रुटवरून एन थोई पोर्टकडे जात होती. फु क्कोक विमानतळापासून अवघ्या २५ किलोमीटर अंतरावर असलेल्या होन में रूट न्गोईजवळ अचानक ही बोट उलटली आणि सर्व प्रवासी समुद्रात फेकले गेले. या बोटीमध्ये एकूण ३६ प्रवासी प्रवास करत होते. ज्यावेळी हा अपघात झाला, त्यावेळी परिसरात पाऊस पडत नव्हता. मात्र, समुद्रातील लाटा अत्यंत वेगवान आणि तीव्र होत्या.



# प्रश्न



एका पाठोपाठ चार दिवस आल्या होत्या. नांदेडमध्ये दिवस घालवण्यापेक्षा गावी जाण्याचा विचार केला. सकाळी पूर्णा आदिलाबाद गाडीचे तिकीट काढून प्रवासाला सुरुवात केली. वेळेवर गाडी आली. जागा मिळवण्याची प्रवाशांची धडपड सुरू होती. सुदैवाने मला जागा मिळाली. पेपर घेऊन वाचत बसलो. स्टेशन आलं, सामान घेऊन गाडीतून उतरलो...रस्त्याला लागलो. त्याचवेळी कानावर हाक आली. ''अरे अशोक थोडं थांब.'' माझे पाय थबकले, मागं वळून पाहतो तर आनंदा माझ्याकडे येत होता. हातातला पेपर बॅगमध्ये अडकून पाठवून बोलता झालो. ''आनंदा सवारी कोठे निघाली?'' अशोक, ''नांदेडलाच निघालो रे. हिमायतनगर स्टेशनवर गाडीची क्रॉसिंग होती. नांदेडला जाणारी गाडी स्टेशन बाहेर उभीच होती. दहा मिनिटात गाडी येऊन सुटणार होती.'' ''आनंदा कधी येणं केलंस?'' अशोक विचारत होता. ''कालच आलो होतो'' आनंदा. ''एवढा तातडीने वापस का चाललास? सुट्ट्या तर आहेत, घरी चल चार दिवस घालूत'' मी समजावून बोललो. ''कुठला आनंद अशोक? अरे माझं जीवन गांडू मी कोणाला भांडू?'' ''अरे वैतागून का बोलतोस, काही विपरीत तर घडलं नाही ना?'' ''अरे रोजचं मडं त्याला कोण रडं?'' अनंता नाराजीत बोलला. ''अरे ह्या कानानं ऐकायचं दुसऱ्या कानानं सोडून द्यायचं, आता तू साधा राहिला नाहीस, मास्तर झालास. मागचा काळ विसर. आई-वडिलांत थोडाच फरक पडणार. घरी चल मनसोक्त बोलूत'' अशोक.

''आरे अशोक जन्मत:पासून आजपर्यंत जगावं म्हणून जगलोच ना!'' शिक्षण घेण्यासाठी समोर प्रश्न होता. आता पुढे जगण्यासाठी काय आहे. पोटापुरता शिकलोय ना. आता पोटापाण्याला लागलो. माझ्या पुढचा प्रश्न सोडवला. भावंडाचा प्रश्न आ वासून पुढे आहे बरं. तू थांब मी तिकीट वापस करून येतो.'' आनंदा तिकीट परतीसाठी गेला. ''बरं मी झाडाखाली सावलीत बसतो.'' आनंदा तिकीट घराकडे गेला. स्टेशन मास्टर फिरत होता. आनंदा तिकीट खिडकीला थांबला. माझे विचार थंड सावलीत सुरू झाले. आनंदाच्या घरी काय घडलं असावं. आनंदाचे घर म्हणजे भारत पाकिस्तानची सरहदच. हे नवीन असल्यामुळे मी आनंदाला कधी विचारत नव्हतो. आज योगायोग आला, पण मधलं गुढ काही समजत नव्हतं. आनंदाच्या घरातील आई-वडील भाऊ-बहीण व घरातले संबंधाबाबत मला आठवण आली.

आनंदाचा बाप धोंडबा गावातला नंबर एकचा चिकु. पैसे खर्च करणे म्हणजे जीवावर संकटच. चांगलं-चुंगलं करून खायचं नाही. दगडाबाई आनंदाची माय धोंडोबाची बायको, धोंडबाला बाप होता. तोही गचकला सर्व व्यवहार बाप पाहायचा. तवाचा काय चांगला होता? धोंडबाच्या हातात सत्ता आली की सर्व व्यवहार बदलले. संसाराला लागणारा खर्च व्यर्थ जातो. धोंडबाला वाटायची इतका खर्च कसा झाला? दगडाबाई तर दगडासारखीच. धोंडोबाचं काहीच सहन करत नव्हती. कोणीही कोणापुढे हवत नव्हते. धोंडावर दगड पडल्यासारखं भांडण चालायचं. बायकांना हागणदरीत याचाच विषय चालायचा. उच्चवर्णीय टोमणे मारायची. दलित ते दलित सुधारायचे नाहीत. दगडाबाई थोडाशा वादाला कंटाळून माहेरी पळायची. आठ दिवसात पुन्हा परत यायची. चार दिवस चांगले जायचे. एवढा असून वर्षा दीड वर्षाला लेकरू व्हायचं. पाठोपाठ तीन मुले एक मुलगी झाली. आनंदा, नागेश, राहुल मुलगी वैशू सर्व शाळेत जात होते.

धोंडबा आणि दगडाबाईचे भांडण जुंपलं की दोन दोन दिवस चुलीला सुट्टी असायची. लेकरांची अवस्था चिमणी पाखरांसारखी व्हायची शेजाऱ्या पाजाऱ्यानं दिलं तर मुलांना तेवढं खायला मिळायचं. घरात जळ म्हणता जळायचं नाही. अन्नधान्याला तोटा नव्हता. ऐकणाऱ्याला खोटं वाटते. वडीलधाडील मुलगा आनंदाच. त्याला समजायचं अन्नधान्य असून उपाशी का वाटायचं. मायबाप इतके निष्ठूर का आहेत. मायला जेवण तयार करायला सांगायचं. तर पोटभर शिव्या खायाचा. आनंदाने दोघांनाही समजून विनंती केली, कोणाच्याही टाळक्यात घुसली नाही. कालच कोल्हा लागलं शिकवायला. असं म्हणून बोलणं कानामागे टाकायचे. लहान या बाळाला घेऊन दगडाबाई माहेरी जायची, जाणते लेकरं घरीच असायची ना विलाजान आनंदाचं करपलेल्या कोडेल्या भाकरी करून खायची. भावंडांना खाऊ घालून स्वत:सोबत अभ्यासाला बसायचा. तिन्ही मुलं वर्गात पहिल्या क्रमांकानं पास होत होती. पण त्याची कदर घरी होत नव्हती. बाहेरचे लोक लेकराचे गुण पाहून हरकायची,

धोंडबा व दगडाबाई दोघेही मरेपर्यंत कष्ट करायची शेतीत उत्पन्न वाढवायचे. अंगाला चांगले-चुंगले कपडे नसायचे. पायात वहान नाही. वागायचे असे का प्रन पडायचा. आनंदाला लोकांच्या लेकराकडं पाहून कोडं पडायचं. दगडाबाई डोकं भांडणामुळे विकोपाला गेली. लेकरं शाळेत गेले होते. दगडाबाईंनं विहिरीत उडी मारली. लोकांची रिघ विहिरीकडे लागली. शाळेतून आनंदा हळूहळू घरी येत होता. दगडाबाई बुटकुळ्या खात होती. माणसांनी पळापळ करून विहिरीत धांद सोडली. पाळणा बांधलेला होता. माणसं विहिरीत उतरली. पाळण्यात टाकून वर काढलं. दगडाबाई बेशुद्ध होती. पोट आडत होतं. वास चालू होता. जाणत्यांनी पोटातलं पाणी काढलं. तशी दगडाबाई शुद्धीवर आली. लोकांच्या बोलण्याकडे आनंदाने पहात होता. मायबापाकडं नजर चुकून पाहत होता. असं का घडलं? असंच घडत राहिलं तर एक दिवस जाईल. लहान लेकराचं कसं होईल? आनंदा विचार करत होता. दगडाबाई चार दिवसात माहेरी निघून गेली. माहेरवाशी यांना हे नवीन नव्हतं. त्यात दु:खही नव्हतं. अन सुखही नव्हतं. या गोष्टीचा मुलीच्या मनावर परिणाम झाला. मुलींनी मनाला लावून घेतलं. दुसऱ्याच्या माय-बापाचं मिळणार प्रेम आठवलं. ताप आला. ताप उतरत नव्हता. ताप मेंदूपर्यंत चढला. त्यातच मुलगी दगावली. चार दिवस सुखात गेले. परत पूर्ववत व्यवहार सुरू झाला. आनंदाने मन कठोर केलं. याच्यातून मुक्ताचा मार्ग फक्त अभ्यास असल्याची जाणीव झाली. पुन्हा पुस्तकातील किडा होऊन अभ्यासाला लागला.

मॅट्रिकची परीक्षा दिली. निकालाकडे लक्ष लागून होतं. थोड्याच दिवसात निकाल लागला. त्याच दिवशी घरात भांडण चालू होते. आनंदाचा पेपरमध्ये फोटो होता. ७० टक्के मार्क्स घेऊन आनंदा जिल्ह्यात पहिला आला. शाळेत सत्कार झाला. हारांनी मान वाकडी होत होती. खरा आनंद त्या दिवशी झाला. गावातील लोक कुतूहालाने पाहून आशीर्वाद देत होते. माय बापाचे धडाचे नाही, की गोडाचे शब्द ऐकायला येत नव्हते. काय माय मायला मया नाही, बाप असून लेकराच्या गुणाची कदर नाही. लेकरं लय गुणी आहेत माय, बाया माणसे शब्द आनंदाच्या कानावर आदळत होते. आनंदा खालच्या घोन घरी आला. माय बापानं पोस्ट घेतलं नाही. शब्दांना विचारलं नाही. आजूबाजूची काही मुलं फक्त पास झाली. तर काही नापास झाली. त्याचा कौतुक चालू होतं. पेढे वाटत होती. आनंद साजरा करत होते. आनंदाला मानेवर भूत बसल्यागत वाटत होतं. आनंदाला पुढचं शिक्षण मिळते की नाही याची काळजी वाटत होती. धोंडबाला भेटायला शाळेतले गुरुजी आले व म्हणाले, ''धोंडबाजी तुमचा मुलगा जिल्ह्यात पहिला आला, त्याला पुढच्या शिक्षणाला पाठवा'' गुरुजी. ''गुरुजी आनंदा शिकुण सवरून पाटील पांडा थोडाच होणार हाय? शेत आम्हला हाय, वकरून वकरून खायला हाय, त्याला करायचं नाही. आयटीआय रांगोळ्या वढायच्या आहेत'' धोंडा तोऱ्यातच बोलला. ''तसं नको पाटील पांड्या घेऊन बसू नका. तो पुढे जिल्हाधिकारी, पोलीस अधिकारी, डॉक्टर, न्यायाधीश, वकील होईल. त्याला इथं कुसडात कशाला ठेवता? गुरुजी म्हणाले. ''तुमचं खरं आहे गुरुजी, परीक मी काही आदला देणार नाही. शिकुन सवरून कोणता लाल मायबापाला पोसायला? हे काय पोसणार. अंथरून पाहून पाय पसरावा म्हणतो गुरुजी'' धोंडबा. ''अहो मोठा झाला आनंदा तर तुमचं नाव मोठं होते. सर्वच सारखे नसतात. एखाद्या मुलानं तसं केलं, म्हणून सर्वच तसं करतात काय गुरुजी''

''गुरुजी माझं डोस्क बिघडू नका, मला त्यात काहीच देणं-घेणं नाही. त्यांना त्याचं काही बी करो'' रागात धोंडबा बोलून गेला. शिक्षकांचा नाविलाज झाला. स्वत: पैसे देऊन तंत्रनिकेतनमध्ये फॉर्म भरला. नंबर लागला. पण जाता आलं नाही. शेवटी डीएडचा फॉर्म भरला. नंबर लागला. घरची भाकरी खाऊन सात-आठ किलोमीटर दररोज चालून जाऊन डीएडचा कोर्स पूर्ण केला. हादगावच्या अध्यापक कॉलेजमधून चांगल्या श्रेणीत आनंदा पास झाला. नोकरी गुरुजी म्हणून लागली. सोबत भावाला पुढील शिक्षणासाठी घेऊन गेला. स्वत: शिक्षण घ्यायचं म्हणून प्रायव्हेटमध्ये डिग्री मिळवली. चांगला शिक्षक म्हणून नाव कमावलं. भावाला पुढचं शिक्षण दिलं. आनंदाची भेट बऱ्याच वर्षापासून होत नव्हती. अचानक स्टेशनवर गाठ पडली. तीही अशा स्थितीत. मी विचार केला, आनंदा उदास का दिसतो? स्टेशनमधून गाड्या निघून गेल्यानंतर आनंदाचं तिकीट वापस घेतलं. आनंदा माझ्याकडे येत होता. मी आनंदाला पहातच उठलो. माझी विचाराची तंद्रीच तुटली. ''अरे आनंदा इतका वेळ का लागला? मी. ''मास्तरांनी सुनावलं गाडी गेल्याशिवाय तिकीट वापस घेता येणार नाही तेव्हा थांबावं लागलं'' आनंदानं वृत्त कथन केलं. ''बर ठीक आहे, आता पुढे चल'' मी म्हणालो. तोंडाला मुजको लावल्यागत वापस घरी निघालो. विचारा विचारात घर जवळ केलं. घरी गेल्यावर जे सांगायचं ते सांगून मोकळे झालोत. मायना मायचं बापान बापाचं कर्तव्य पार पाडावं, भांडणाला शेंडा ही नाही आणि बुडही नाही. जर मायना असाच जीव दिला तर भावंडाचं कसं? कसं मला पंख फुटले, त्याचं कसं? आनंदा विचार करत होता.बैलगाडीत थैलीभर ज्वारी टाकली आनंदा गाडी जुंपणार, घेऊन जाणार तेव्हा धोंडबाने बोंब ठोकली. ''गाडी बैल ज्वारी घेऊन विकायला आनंद निघाला रे. माझं घर बुडलं'' धोंडबा बोंबलला.

''व्हय रे आनंदा मास्तर झालास. बापाला वाईट इटक बोलून आणि घरातला मालटाल पळवनं बैलगाडी विकायला नेणं सोबत नाही रे दोवा'' गावातला किसन पाटील बोलला, तेही तोऱ्यातच. ''असं कसं म्हणता पाटील, मी कशाला विकु. मायला सोबत नेत आहे. रागात काही नाही ना काही झालं तर काय घेऊ? ज्वारी खायला लागते, म्हणून घेऊन चाललोय'' आनंदा समजदारपणे बोलला. ''व्हय मालक आता नवकरी हाय तर एवढी हमरी तुमरी करायलाय. हे मवा मागं पुढं काटा काढल्या बिगर राहील काय? ज्वारी न्यायची नेऊ द्या. गाडी बैल देईना'' धोंडबा बोलला. ''माझ्यावर विश्वास नसेल तर माल पोहोचू द्या'' आनंदा बोलला, ''व्हय रे धोंड्या, आनंदा म्हणते ते बरोबर हाय'' किसन पाटील बोलला.

''मला भरोसा नाही रोजगार लावून पाठवतो'' धोंडबा. विस रुपये रोजचा रोजगार लावून दिला. गाडीत माल नेला. आनंदाने मायला आजोळी ठेवलं. मायला खर्च आहे. महिन्याला तिला 'पैसे देत गेला. भाऊ सोबत ठेवणे बापाला गैरसमज वाटू लागला. जमीन, घर विकायची हाय. असं लोकांना सांगू लागला. आनंदाला वाटत होतं सर्व विकु द्या, माणसं घरातील सुखरूप राहावं, असं मनात ठेवून होता. आनंदा धमकीला भीत नव्हता. बापाने आनंदाची नोकरी घालवण्याची भाषा वापरली. गावातल्या वाईटावर असणाऱ्या लोकांना बरं वाटू लागलं. आनंदाने विचार केला. घरात लोकांचं बोट नको शिरायला. बापाला सोबत ठेवायचं. मायला गावी ठेवायचं शेत लावायचं. बापान नांदेडात बसून खावाव. त्याच वेळी धोंडीबान हा विचार हाणून पाडला.

''दगडी मही बायको व्हय, मया हाताखाली रहावाव, मी तिच्या हाताखाली मरावं बायको माहेरी राहून लेखाकडे जाऊ नव्ह.'' ''धोंडबा रागात बोलला सारं वय गेलं कधीच गोडी नाही, आता कुठे येणार आहे'' आनंदा रागात बोलला.

''आबे मायला संग नेतो मागचं म्हणालास, तिच्या माहेरला कशाला घेऊन गेलास'' धोंडबा हातवारे करत बोलला. ''शहरात खर्च झेपत नाही. एका खोलीत चार माणसे कसे राहणार? म्हणून मायला मामाकडे ठेवलो. ह्यात कोणतं बिघडलं आनंदा समजावून सांगत बोलला. ''सारं इथेच बिघडलं? इथला माल टाल तुही पगार सार तिकडंच देयाय. तुझे मामा सोकावटे प्यायला थोडंच करावं वाटलं, नाहीतर बहिणीकडून खाया मिळालं. नवऱ्याच्या हाताखाली वागू नको सांगत असतील. तू तर तूच आहेस, मया बंबुऱ्या मारी जे व्हईल ते व्हऊ दे. मव्ह नशीब मया संग. तुझं नशीब तुह्या संग. तूह मी लग्न बी करणार नाही, लग्नाला बी येणार नाही, चल निघ इथून.'' धोंडबा वटी खाऊन जोरात बोलायला लागला. ''बाबा तुम्ही वडील आहात, तुमच्या तोंडाला हात लावायला मला जमत नाही, तुमच्यान माझं काहीच अडत नाही'' आनंदा नाराजीने बोलला. बापाचा न्याय कोणत्या कोर्टात करावा, एकत्र कुटुंब ठेवायचा आनंदाचा विचार बापाने पुसून टाकला. त्याच वेळी किसन पाटलाच्या तोंडून निघालेले बोल ऐकायला आलेत.

''जाऊ द्या रे, मुटभर घुगऱ्या रात्रभर मचमच काय कामाची? आनंद मास्तर झाला, त्याला नाही भाकर तुकडा द्यायला जवळ, असं वाटते. आजूबाजूला कशाला ठेवील, आनंदाने रांड ठेवली आसल. राती-बेराती येत असेल, म्हणून तर मायबापाची फोडा फोडी त्यानं केली. आपण खुशाल मजा मारत असल'' किसन पाटलाने संसारात बिबे घालवायचं काम केलं. ''पाटील असले प्रकार तुमच्या जातीत चालत असतात. ते आमच्या इथे बिबे घालायचं काम करणं बरं नव्हं. पाटील मी खानदानी अभ्यासू बायको ठरवली. ती शाळेत शिक्षिका आहे. असला खर्चिक लग्न सोहळा नको म्हणून कायदेशीर लग्न ठरलं आहे.'' आनंदा विचारपूर्वक बोलाला. ''आनंदाने लग्न केलं. साक्षीला अशोक होताच. कोर्ट मॅरेज झालं. भाऊ मेडिकलला लागला. आनंद सुरू झाला. अचानक निरोप धडकला. अचानक धोंडीबाचा मृत्यू झाला. जगाच्या लाजासाठी आनंदा सहकुटुंब गेला. विधी आटपूनन गावाकडे निघणार होता. एका पाहुण्याने सर्वासमक्ष प्रन मांडला, ''आनंदा गुरुजी, दिवस-तेरवी कधी आहे? सर्व मयताला आलेले आपले सोयरीधायरे विचारायलेत.'' ''सोयरे हो याच्यापुढे कोणताही विधी होणार नाही, जितेपनी नाही गोडी, मेल्यावर कशाला बंधन तोडी? ''माझे प्रश्न मला सोडवू द्या, तुमचे प्रन तुम्ही सोडवा'' उत्तराची अपेक्षा न करता.

**–अर्जुन वाघमारे**
वादळ, चंद्गुप्तनगर, नांदेड
मो.८४२१६५६०८६

# मातीशी नाळ जुळलेला काळजाचा ठाव घेणारा कवितासंग्रह : 'माय, माती अन् ती'

**पुस्तक परीक्षण**

**नासा येवतीकर**
मुख्याध्यापक, प्रा. शा. पिंपळगाव,
ता. धर्माबाद, जि. नांदेड
मो. ९३२२१५६५८०




उच्चविद्याविभूषित असलेल्या व कवी, निवेदक म्हणून सर्वदूर सुपरिचित असलेल्या कवी अनिकेत देशमुख यांचा नुकताच प्रकाशित झालेला दुसरा काव्यसंग्रह 'माय, माती अन् ती' वाचण्यात आला. याआधी त्यांचा पाऊलखुणा नावाचा काव्यसंग्रह प्रकाशित झाला असून, वाचकांनी त्यास चांगला प्रतिसाद दिला. अनिकेत देशमुख हे साहित्यिक जगतातलं अष्टपैलू व्यक्तिमत्त्व म्हणून अनेकांना सुपरीचित आहेत. त्यांची कविता त्यांच्यासारखीच साधी, सरळ, सोपी, नितळ, लयदार, कसदार मातीशी नाळ जोडणारी आहे. हा काव्यसंग्रह काव्यरसिक वाचकांच्या काळजाचा ठाव घेणारा काव्यसंग्रह आहे. काव्यसंग्रहाच्या मलपृष्ठावर असलेली युवा कादंबरीकार पुष्पराजदादा गावंडे माजी सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ मुंबई यांची पाठराखण या कवीला व या काव्यसंग्रहाला समर्पक अशी आहे.

या काव्यसंग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील नामवंत लोककवी प्रा. प्रशांतदादा मोरे यांनी चिंतनात्मक व अभ्यासपूर्ण स्वरूपात लिहिलेली सृजनाची गाथा-माय, माती अन् ती ही प्रस्तावना वाचनीय आहे. तसेच काव्यसंग्रहाची महती वाढविणारी आहे. त्याचबरोबर कविता कशी असावी हे अत्यंत साध्या, सोप्या शब्दात आपल्या शुभेच्छा संदेशामध्ये प्रसिद्ध गझलकार नितीन देशमुख यांनी मांडले आहे. त्यांनी कवी अनिकेत देशमुख यांच्या कवितेची वाट प्रसिद्ध लोककवी डॉ. विठ्ठल वाघ यांच्या कवितेच्या वाटेवर जाणारी कविता असा महत्त्वाचा उल्लेख केला आहे. जो महत्त्वाचा आहे.

आईच्या मायेतून आणि मातीच्या सहवासातून माणसाचे व्यक्तिमत्त्व घडते. या अनुभवांमधूनच लेखक किंवा कवीला प्रेरणा मिळते आणि त्याची लेखणी सशक्त बनते. लेखणी माय आणि मातीचे ऋण व्यक्त करण्याचे कार्य करते. त्यामुळे माय, माती आणि लेखणी या तिन्ही मानवी जीवनाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. या कवितासंग्रहात एकूण ५७ कविता असून, त्या वेगवेगळ्या सामाजिक विषयांवर आधारित रचना आहेत.

आपल्या पहिल्याच माय कवितेत कवी म्हणतात,

धग इस्तवाची सोसे, माय थापते भाकर
मायासाठी 'कोहिनूर', तिच्या हाताची बिल्लोर

अर्थात आई आपल्या कुटुंबासाठी किती कष्ट घेते, याचे सुंदर वर्णन या ओळींमध्ये केले आहे. चुलीतील जळत्या आगीची धग सहन करून आई प्रेमाने भाकरी थापते. तिच्या कष्टांमागे केवळ कर्तव्य नसून अपार माया आणि त्याग दडलेला असतो. आईच्या हातची भाकरी ही अतिशय चविष्ट आणि अमूल्य असते. म्हणूनच कवीने आईच्या हातच्या बिल्लोर म्हणजेच बांगडीची तुलना जगातील सर्वात मौल्यवान 'कोहिनूर' हिऱ्याशी केली आहे. आईचे प्रेम, त्याग आणि तिच्या हातच्या अन्नाची गोडी ही अनमोल असल्याचा संदेश या ओळींतून व्यक्त होतो.

आनंदसरी कवितेत कवी एका ठिकाणी म्हणतो,

घाम रक्ताचं बियाणं
बळी पेरतो मातीत
खरा पाऊस कळतो
शेतकऱ्याच्या जातीत

अर्थात शेतकरी आपल्या शेतात पीक घेण्यासाठी खूप मेहनत करतो. तो जणू स्वत:च्या घामाचे आणि रक्ताचेच बियाणे मातीत पेरत असतो, म्हणजेच शेतीसाठी तो अथक परिश्रम करतो. पाऊस वेळेवर पडणे किंवा न पडणे याचा सर्वाधिक परिणाम शेतकऱ्यावर होतो. त्यामुळे पावसाचे खरे महत्त्व, त्याची किंमत आणि त्याची प्रतीक्षा काय असते, हे शेतकऱ्यालाच सर्वाधिक जाणवते. या ओळींतून शेतकऱ्याचे कष्ट, त्याचे निसर्गावर असलेले अवलंबित्व आणि पावसाशी असलेले त्याचे अतूट नाते व्यक्त झाले आहे.

दु:ख वावराचे, साहेब आणि वांझ या कवितेतून कवीने शेतकऱ्याचे कष्ट आणि दु:ख वाचकासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

घाबरायचं नाही या लयबद्ध असलेल्या कवितेत कवी म्हणतो,

कृषीप्रधान देशातून दिसेनाशी होईल माती
सिमेंटच्या जंगलात अमली पदार्थांच्या राती
जुलमी कपटी धोरणास या गाडायाचं हाय
घेऊ राखेतून उभारी पुन्हा उडायाचं हाय
घाबरायचं नाय गड्या घाबरायचं नाय...

अर्थात भारत हा कृषीप्रधान देश असला तरी आज वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण आणि चुकीच्या धोरणांमुळे सुपीक जमीन नष्ट होत चालली आहे. शेतीची जमीन कमी होऊन तिच्या जागी सिमेंटची जंगले उभी राहत आहेत. त्यामुळे समाजात अनेक सामाजिक समस्या, विशेषत: अमली पदार्थांचे वाढते प्रमाण, निर्माण होत आहे. या परिस्थितीस कारणीभूत असलेल्या अन्यायकारक व कपटी धोरणांविरुद्ध संघर्ष करणे आवश्यक आहे. हा बुलंद आवाज या काव्यसंग्रहातून मांडला आहे.

कवी वरील ओळींतून निराश न होता संकटांवर मात करण्याचा संदेश देतो. जरी परिस्थिती प्रतिकूल असली, तरी राखेतून पुन्हा फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उभे राहून नव्या जोमाने प्रगती करावी, असे तो सांगतो. कोणत्याही संकटाला घाबरून न जाता धैर्याने आणि जिद्दीने त्याचा सामना करण्याचे आवाहन या कवितेतून करण्यात आले आहे.

अनेक कवी संमेलन गाजविलेले कवी अनिकेत देशमुख यांची स्वत:ची आवडती कविता कविता म्हणजे

नांगराचा फाळ असते कविता
भजनातील टाळ असते कविता
काळ्या आईला हसवणारं
काळंकुट्ट आभाळ असते कविता
ही कविता वाचकाच्या मनात रुंजी घालत राहते.

शहरात होणारी घुसमट कवी आपल्या कवितेत मांडताना लिहितो

चाल दोस्ता आतातरी जाऊ आपल्या गावा
माणसं यंत्र झालीत अन् जहरी झालीय हवा

या कवितेतून कवीला सांगायचे आहे की, आधुनिक जीवनात माणसे अत्यंत व्यस्त आणि यांत्रिक झाली आहेत. शहरातील धकाधकीच्या जीवनात माणसांमधील प्रेम, जिव्हाळा आणि माणुसकी कमी होत चालली आहे. तसेच प्रदूषणामुळे वातावरणही दूषित झाले आहे. त्यामुळे कवी आपल्या मित्राला म्हणतो की, आता तरी आपण आपल्या गावाकडे जाऊया. गावातील निसर्गरम्य वातावरण, स्वच्छ हवा आणि माणसांमधील जिव्हाळा यामुळे मनाला शांतता आणि समाधान मिळेल. या ओळींतून शहरी जीवनातील कृत्रिमता आणि ग्रामीण जीवनातील साधेपणा, माणुसकी व निसर्गप्रेम यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

बघा एवढं करता आलं तर, साहेब, ओल आणि मढं या कवितेतून सध्याच्या व्यवस्थेवर ताशेरे ओढले आहेत.

कवी शोकांतिका या कवितेतून जो शोक व्यक्त करत आहे, तो सर्वांनाच असायला हवा, ते म्हणतात,

कुपोषणानं दरवर्षी इथं, हजारो जीव मरतात
मंदिरांना कळस मात्र, दररोज सोन्याचे चढतात !

अर्थात समाजातील विषमता आणि संवेदनाहीनता यांवर या ओळींतून भाष्य करण्यात आले आहे. आपल्या देशात आजही अनेक गरीब, उपेक्षित आणि लहान मुले कुपोषणामुळे दरवर्षी मृत्युमुखी पडतात. त्यांना अन्न, औषधे आणि मूलभूत सुविधा मिळत नाहीत. दुसरीकडे, मंदिरांवर मात्र मोठ्या प्रमाणात सोन्याचे कळस चढवले जातात आणि भरपूर पैसा खर्च केला जातो.

बापू या कवितेतून कवी बापूंनी दिलेली खेड्याकडे चला ही हाक आठवण करून देतात तसेच आज बापूजीच्या स्वप्नातील भारत हरवला असल्याची खंत देखील व्यक्त करतात. आपल्या कवितेत ते म्हणतात,

आता हिम्मत नाही कुणातच बापू
'चले जाव' म्हणायची
इथं प्रत्येकालाच घाई
चरख्याजवळ सेल्फी काढायची !!

या ओळींतून कवीने आजच्या समाजातील दिखाऊपणा आणि महात्मा गांधी यांच्या विचारांपासून दूर गेलेल्या समाजाचे वास्तव चित्रण मांडले आहे. स्वातंत्र्यलढ्यात महात्मा गांधींनी दिलेल्या 'चले जाव' (भारत छोडो) आंदोलनाच्या हाकेला प्रतिसाद देऊन लोकांनी अन्यायाविरुद्ध लढा दिला. परंतु आजच्या काळात अन्याय, भ्रष्टाचार आणि सामाजिक समस्यांविरुद्ध आवाज उठवण्याचे धैर्य अनेकांमध्ये दिसत नाही.

एकंदरीत हा काव्यसंग्रह म्हणजे आपल्याला जन्म देणाऱ्या आई विषयी, आपल्या मायभूमी विषयी, देशाविषयी, सर्वांचं पालनपोषण करणारा तारणहार बळीराजा, देशाचा संरक्षक सीमेवरचा जवान या सर्वांविषयी प्रत्येकाच्या मनात अभिमान तयार करणारा आहे. कवी विदर्भातील असल्याने काही शब्द वैदर्भीय वाटतात. मात्र भाषा साधी, सरळ आणि सोपी आहे. त्यामुळे ही कविता वाचकाला आपली वाटते आणि त्याच्या मनाला साद घालते हे या काव्यसंग्रहाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत समर्पक असे आहे. अक्षरशिल्प प्रकाशन अमरावती कडून हा काव्यसंग्रह प्रकाशित करण्यात आलेला आहे. पुस्तकाची बांधणी, भाषा, अंतरंग, मुखपृष्ठ, मलपृष्ठ एकंदरीत सर्वच अत्यंत दर्जेदार झाले आहे. वाचनाची आवड असणाऱ्या प्रत्येक रसिक वाचकांनी हा काव्यसंग्रह विकत घेऊन वाचावा असा आहे.

आपल्या बहारदार निवेदनासाठी आणि वेगळ्या धाटणीच्या कवितेसाठी कवी अनिकेत देशमुख यांना त्यांच्या पुढील लेखनासाठी खूप साऱ्या शुभेच्छा!

**माय, माती अन् ती (मराठी कवितासंग्रह)**
**कवी अनिकेत जयंतराव देशमुख**
**गोपालखेड, जि. अकोला**
**स्वागत मूल्य – २४५रु.**
**अक्षरशिल्प प्रकाशन अमरावती**

# सगळेच नॉटरिचेबल


काय चालले आहे हे,
सगळेच नॉटरिचेबल,
हा नेटवर्क इशू की
आहे बहुदा, आणखी काही आहे,
जे कळतंय, पण वळत नाही.
माणसातील प्रेम
नॉट रिचेबल, नात्यातील
जिव्हाळा, नॉटरिचेबल.
राजकारणात नेते
नॉटरिचेबल, निसर्गात
मनासारखा पाऊस, नॉट रिचेबल,
खिशात पैसा नॉटरिचेबल.
राज्यात स्थिरता नॉटरिचेबल,
देशात स्वस्थाई नॉटरिचेबल,
जगात शांतता नॉटरिचेबल,
देवा तू एकाच दिसतोस रिचेबल,
नको होऊ देऊ माणसाला,
दुसऱ्या माणसाशी आता नॉटरिचेबल.

**–अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

# घटस्फोटाचे वाढते प्रमाण चिंताजनक

लग्नाच्या गाठी स्वर्गात बांधल्या जातात असे म्हटले जाते. पूर्वी या गाठी घट्ट बांधल्या जायच्या, कारण या गाठी आयुष्यभर तुटत नसायच्या. इतकंच काय तर हाच जोडीदार पुढील सात जन्मी मिळो अशी प्रार्थना पतिपत्नी देवाकडे करायचे. हल्ली मात्र या लग्नाच्या गाठी सैल बांधल्या जातात की काय अशी शंका येऊ लागली आहे, कारण आयुष्यभर सोडाच, पण काही वर्षे देखील विवाह झालेले दांपत्य एकत्र नांदायला तयार नाहीत. लग्नानंतर अवघ्या काही वर्षात पतीपत्नीमध्ये वाद होतो आणि हा वाद थेट घटस्फोटापर्यंत पोहचतो.

आज देशातील न्यायालयात घटस्फोटाचे लाखो याचिका प्रलंबित आहेत. घटस्फोटाची नवी याचिका दाखल झाली नाही असा एकही दिवस उगवत नाही. घटस्फोटाचे लाखो खटले प्रलंबित असल्याने सहा महिन्यांचा आत घटस्फोटाचा निकाल द्यावा असा निर्णय न्यायालयाने घेतला आहे. घटस्फोटाचे खटले तातडीने निकाली काढले जात असले तरी त्यात नव्याने भर पडत असल्याने न्यायालयही हतबल झाले आहे. वास्तविक दोन दशकांपूर्वी घटस्फोटाचे प्रकरण नगण्य स्वरूपात होते. शेवटचा पर्याय म्हणून घटस्फोटाकडे पाहिले जात होते. आज न्यायालयात दाखल होणाऱ्या घटस्फोटाची कारणे पाहिले तर चक्रावून जाल. पत्नीला साडी नेसता येत नाही, पत्नीने केलेला स्वयंपाक बेचव असतो, पत्नी सतत टीव्ही आणि मोबाईलवर असते, पत्नी आपला मान राखत नाही यासारख्या हास्यास्पद आणि मनाला न पटणाऱ्या कारणांनी घटस्फोट मागितला जातो.



पत्नीकडूनही घटस्फोटाची अशीच काहीबाही कारणे दिली जातात. पती आपल्याला वेळ देत नाही. पती फक्त त्याच्या आई-वडिलांचेच ऐकतो, पती आपल्याला बाहेर फिरायला नेत नाही, पती आपल्या मनासारखं वागत नाही अशी हास्यास्पद कारणे देऊन घटस्फोटाची मागणी केली जाते. याशिवाय पती मारहाण करतो, अनैसर्गिक संबंधांची मागणी करतो, पत्नी उलट बोलते, पती म्हणून मान देत नाही अशा कारणांनी देखील घटस्फोटाची मागणी केली जाते अशी आणि यापेक्षाही अनेक वेगवेगळी कारणे घटस्फोटासाठी दिली जातात अर्थात सर्व कारणांचा अभ्यास करूनच न्यायालय घटस्फोटाचा निकाल देते. अर्थात अशा किरकोळ कारणांसाठी घटस्फोटाची मागणी करणे कितपत योग्य आहे याचा विचार दोघांनीही करायला हवे. नाते कोणतेही असो त्यात राग रुसवा असतोच, संसार म्हटले की भांड्याला भांडे लागतेच, जर दोघात वाद झाला की दोघांपैकी एकाने शांत राहावे थोड्या वेळात राग शांत होतो आणि वादही मिटतो मात्र शब्दाला शब्द दिला की वाद वाढतो आणि वादाचे रूपांतर मोठ्या भांडणात होते. त्यात दोन्ही कडील नात्यात कोणीना कोणी तेल ओतणारा असतोच, असे तेल ओतणारे व्यक्ती आल्यास हा वाद थेट न्यायालयात पोहचतो. अगदी क्षुल्लक कारणही नाते तोडायला पुरेसे ठरत असल्याने नात्याची गुंफण घालताना थोडे सावरूनच वागावे लागते.

माझे चुकलेच हे मनाने मान्य करावे लागते. तरच नाते टिकते आणि त्यातही गोडवा राहतो. नात्यात सर्वात महत्वाचा असतो तो विश्वास. जर विश्वासाला तडा गेला तर नात्यात वितुष्ट येतेच म्हणून पतिपत्नीमध्ये विश्वास खूप महत्वाचा आहे. विश्वासाला तडा जाऊ न देण्याची जबाबदारी दोघांचीही आहे. नात्यात दुरावा होण्याचे आणखी एक महत्वाचे कारण म्हणजे पतीपत्नीमध्ये असलेला अहंकार. अहंकारामुळेच नाती तुटतात, म्हणूनच दोघांनीही अहंकार दूर ठेवायला हवा. अहंकाराला दूर ठेवून परस्परावरील विश्वास कायम ठेवला तर नात्यात दुरावा निर्माण होणार नाही आणि घटस्फोटाचे प्रमाणही कमी होईल.

**–श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# खा. अशोकराव चव्हाण यांनी घेतली महापालिकेत प्रलंबित विकासकामांबाबत आढावा बैठक

## बैठकीस नागरिक, नगरसेवक आणि पालिका अधिकाऱ्यांची उपस्थिती

**नांदेड (प्रतिनिधी)–** महानगरपालिका क्षेत्रातील प्रलंबित विकासकामे जलदगतीने पूर्ण व्हावीत आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्यांचा तत्काळ निपटारा व्हावा, यासाठी माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, दि. ११ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता महानगरपालिका कार्यालयात एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.




या बैठकीत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, आणि वाहतूक कोंडी यांसारख्या विविध ज्वलंत मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली व अधिकाऱ्यांना कडक निर्देश देण्यात आले. या बैठकीला महापौर कविता मुळे, महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, आ. अमरनाथ राजूरकर, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंघ गाडीवाले, महिला बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी, माजी सभापती किशोर स्वामी यांच्यासह सर्व विभागांचे अधिकारी, अभियंता, विविध प्रभागातील नगरसेवक, भाजपचे स्थानिक पदाधिकारी आणि शहरातील विविध भागांतून आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांनी थेट लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांसमोर आपल्या भागातील समस्या मांडल्या.

या बैठकीत प्रामुख्याने बोरबन भागातील मोकळ्या जागेत उद्यान विकसित करणे, तारासिंग मार्केटमधील रस्ता, जंगमवाडी व वजिराबादमधून जाणारा डी. पी. रस्ता, आसरानगर नागरी वस्तीवरील आरक्षण रद्द करणे, आसरानगर पाण्याची पाईप लाईन, तरोडा (खु) भागातील प्रस्तावित गॅस स्टेशन, असदवन येथील मुख्य रस्ता, नदिम कॉलनी गाडेगाव रस्ता व इंदिरा नगर ते शोभा नगर येथील मनपाच्या जागेवरील अतिक्रमित जागा मोकळी करणे या विविध विषयांवर सविस्तर चर्चा करुन सदरील कामे तत्काळ निकाली काढण्याचे निर्देश खा. चव्हाण यांनी दिले आहेत.

नांदेडकरांनी आमच्यावर दाखवलेला विश्वास सार्थ ठरवणे हे आमचे कर्तव्य आहे. शहरातील अंतर्गत रस्त्यांचे जाळे, पाणी आणि मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी मिळून काम केले पाहिजे. कामात दिरंगाई करणाऱ्या किंवा निष्काळजीपणा दाखवणाऱ्या अधिकाऱ्यांची गय केली जाणार नाही. सर्व प्रलंबित प्रकल्प वेळेत पूर्ण होऊन नागरिकांना दिलासा मिळाला पाहिजे, असे खा. चव्हाण म्हणाले.

बैठकीदरम्यान विविध प्रभागांतील नगरसेवकांनी आपापल्या भागातील प्रलंबित विकासकामांची माहिती खा.चव्हाण यांच्याकडे सादर केली. नागरिकांनी देखील प्रभागातील प्रलंबित रस्ते, ड्रेनेज लाईन, पथदिवे आणि कचरा संकलनाबाबतच्या तक्रारी थेट मांडल्या. या सर्व समस्यांवर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी जागेवरच उत्तर देऊन निश्चित कालमर्यादेत कामे पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

# कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कारांचे आज वितरण

- खा. अशोकराव चव्हाण, खा. ॲड. उज्ज्वल निकम यांची प्रमुख उपस्थिती
- विजयाताई रहाटकर, राजेंद्र दर्डा यांच्यासह पाच जणांचा होणार सन्मान

**नांदेड (प्रतिनिधी)–** कै. सौ. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्कार सोहळ्याचे रविवार, दि. १२ जुलै रोजी आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमात यावर्षीपासून सुरू करण्यात आलेला डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



रविवार, दि. १२ जुलै रोजी स्टेडियम परिसरातील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात होणाऱ्या या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ खा. उज्ज्वल निकम उपस्थित राहणार आहेत. आ. श्रीजया चव्हाण व उद्योजिका सुजया चव्हाण यांची उपस्थिती असेल.

या समारंभात राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजयाताई रहाटकर यांना कै. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच डॉ. शंकरराव चव्हाण जीवनगौरव पुरस्काराची सुरुवात करण्यात आली असून, लोकमतचे एडिटर इन चीफ तथा राज्याचे माजी मंत्री राजेंद्र दर्डा यांना हा पहिला पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या सोबतच छत्रपती संभाजीनगर येथील स्नेहसावली या सामाजिक संस्थेचे संस्थापक डॉ. बालाजी आसेगावकर, विमान क्षेत्रात गगनभरारी घेतलेले मराठमोळे व्यावसायिक मॅब एव्हिएशनचे संस्थापक मंदार भारदे व महिला बुद्धिबळ विश्वविजेती दिव्या देशमुख यांना देखील कै. कुसुमताई चव्हाण स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या पुरस्कार सोहळ्यास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संयोजक संतोष पांडागळे, अभिजित देशमुख, बालाजी जाधव, संदीप पाटील. सीए मनोहर आयलाने, राजेश शिंदे यांनी केले आहे.

# काँग्रेसने काढला जनआक्रोश मोर्चा

(छाया: नरेंद्र गडप्पा )



**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील सरकारने विकासाच्या नावाखाली केवळ भ्रष्टाचार आणि टक्केवारीचे राजकारण केल्यामुळे विकासकामांची दुरवस्था झाली असून, सर्वत्र रस्ते, पूल व इतर सार्वजनिक कामांना भगदाड पडल्याचा आरोप करत नांदेड युवक काँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर राज्य सरकारच्या विकासाला भगदाड या विषयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

या मोर्चात खा. रवींद्र वसंतराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी त्यांनी राज्य सरकारच्या कथित भ्रष्ट कारभाराचा निषेध व्यक्त करत, जनतेच्या पैशांचा अपव्यय करून निकृष्ट दर्जाची विकासकामे केली जात असल्याचा आरोप केला.

मोर्चादरम्यान विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या सरकारच्या कारभाराचा निषेध करण्यात आला. राज्यातील रस्ते, विशेषतः नांदेड येथील नव्यानेच ढासळलेला ब्रिज आणि विविध विकासकामांची झालेली दुरावस्था ही सरकारच्या निष्काळजीपणाचे आणि भ्रष्ट व्यवस्थेचे प्रतीक असल्याचे सांगत दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी युवक काँग्रेसचे पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मोर्चेकऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

# किनवट नगर परिषदेच्या मनमानीला हायकोर्टाचा दणका

## बेकायदेशीर बांधकाम पाडल्याप्रकरणी किनवट नगर परिषदेला मोबदला देण्याचे आदेश

**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट नगर परिषदेच्या मनमानी आणि अवैध कारभाराला मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मोठा दणका दिला आहे. दोन न्यायाधीशांच्या खंडपीठाने दि. ३० मार्च २०२६ रोजी याप्रकरणी अंतिम निकाल देत याचिकाकर्त्यांच्या बाजूने निर्णय दिला. ३३ वर्षांच्या कायदेशीर संघर्षाला अखेर न्याय मिळाला आहे.

किनवट येथील एस. व्ही. एम. कॉलेजच्या पाठीमागे शेषराव ज्ञानोबा गायकवाड व रमेश कवटीकवार यांनी सन १९९३ मध्ये शासनमान्य ले-आऊटमधील भूखंड क्र. १८ व २१ खरेदी केले होते. सन १९९६ मध्ये नगर परिषदेने सदर प्लॉट डी. पी. रोडमध्ये जात असल्याचे कारण देत पायापर्यंत आलेले बांधकाम थांबवण्याची नोटीस दिली.

याविरोधात याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात रिट याचिका क्र. ५५४०/२०११ दाखल केली. न्यायालयाने बांधकाम परवानगी देण्याचे निर्देश दिले असतानाही, तत्कालीन मुख्याधिकाऱ्यांनी आदेशाला केराची टोपली दाखवत २७ जून २०१३ रोजी जेसीबीच्या साहाय्याने झालेले बांधकाम बेकायदेशीरपणे पाडून टाकले.

यानंतर पुन्हा रिट याचिका क्र. ५२८६/२०१३ दाखल करण्यात आली. २९ फेब्रुवारी २०१६ रोजी न्यायालयाने भूखंड व ले-आऊटची नव्याने मोजणी करून अहवाल देण्याचे व बांधकाम परवानगी देण्याचे आदेश दिले होते.

दरम्यान नगर परिषदेने २०१८ मध्ये जुना ले-आऊट रद्द करून नवा ले-आऊट मंजूर केला. या सर्व पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने ३० मार्च २०२६ च्या अंतिम आदेशात स्पष्ट केले की, बाधित झालेल्या भूखंडांना भूमी संपादन कायदा २०१३ नुसार योग्य तो मोबदला देण्यात यावा. ही संपूर्ण प्रक्रिया विहित मुदतीत पूर्ण करण्याचे आदेश नगर परिषदेला देण्यात आले आहेत.

१९९३ मध्ये भूखंड खरेदी केल्यापासून ३३ वर्षांनी आणि १५ वर्षांच्या न्यायालयीन लढ्यानंतर या प्रकरणाला न्याय मिळाला. या प्रकरणात याचिकाकर्त्यांची बाजू ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. तळेकर ॲन्ड असोसिएट्सच्या ॲड. प्रज्ञा तळेकर व ॲड. आवटे यांनी मांडली.

न्यायालयाचा आदेश मिळाल्यानंतर दि. ९ एप्रिल २०२६ रोजी किनवट नगर परिषदेला निवेदन देण्यात आले. तसेच ८ व ९ जुलै २०२६ रोजी स्मरणपत्रही देण्यात आले. मात्र आजपर्यंत नगर परिषदेने या आदेशाची अंमलबजावणी केली नाही.

# जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी जुलै-२०२६ महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी १४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

# अवैध दारुविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई; दीड लाखाचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील नांदेड ग्रामीण पोलीस पथकाने अवैध दारू विक्री आणि वाहतुकीविरोधात मोहीम राबवत मोठी कारवाई केली आहे.

मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार रमामाता आंबेडकर चौक ते उड्डाणनगर मार्गावर अवैध देशी व विदेशी दारूची विक्री आणि वाहतूक होणार असल्याची खात्रीशीर माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे नांदेड ग्रामीण पोलीस पथकाने सापळा रचून एका संशयित इसमास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव साईनाथ बालाजी कदम (रा. चिखली, ता. कंधार, जि. नांदेड) असे सांगितले.

आरोपीच्या ताब्यातून (MH 26 CU 6707) क्रमांकाची मोटारसायकल, जीची किंमत अंदाजे ९० हजार रुपये आहे, ती जप्त करण्यात आली. तसेच त्याच्याकडे देशी आणि विदेशी दारूच्या बाटल्या (१८० मि.ली.) सापडल्या, ज्यांची किंमत ४१ हजार ४२० रुपये इतकी आहे. अशाप्रकारे एकूण १ लाख ३१ हजार ४२० रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. या प्रकरणी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ८५२/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई वरिष्ठांच्या आदेशावरून उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या पथकाने केली.

# आ. बोंढारकरांनी केली ढासळलेल्या विष्णुपुरी पुलाची पाहणी; अधिकाऱ्यांना सुनावले खडे बोल

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण नांदेडचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी विष्णुपुरी येथील उड्डाणपुलाच्या ढासळलेल्या भागाची पाहणी केली. यावेळी केटीआयएल कंपनीच्या अधिकाऱ्यांना पुलाच्या निकृष्ट बांधकामावरून धारेवर धरून खडे बोल सुनावले. एवढेच नाही तर या मार्गावर तयार करण्यात आलेल्या सर्व पुलांची योग्य तपासणी करून तत्काळ अहवाल द्यावा अशा सूचनाही त्यांनी केटीआयएल कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिल्या.



नांदेड- लातूर महामार्गावरील विष्णुपुरी येथे नव्याने उड्डाण पूल बांधण्यात आला आहे. कोट्यावधी रूपये खर्च करण्यात आलेला पूल तयार होऊन अवघे काही महिने उलटले आहेत. सध्या पुलावरून वाहतूकही सुरू झाली आहे. परंतु अंत्यत वर्दळीच्या या पुलाच्या संरक्षण भिंतीचा काही भाग अचानक कोसळला होता. यात २ विद्यार्थिनी थोडक्यात बचावल्या. अधिवेशनाहून परतलेल्या नांदेड दक्षिणचे आ. आनंदराव बोंढारकर यांनी याच पुलाच्या ढासळलेल्या भागाची शनिवारी पाहणी केली.

यावेळी रातोरात पुलाच्या भेगा सिमेंट भरून बुजवल्याने आ. बोंढारकर चांगलेच संतापले. तुम्ही सिमेंट घालून निकृष्ट दर्जाचे काम करता का? असे करायला तुम्हाला कोणी सांगितले? असे म्हणत आमदाराने प्रोजेक्ट मॅनेजरला धारेवर धरले. दरम्यान या कामाची चौकशी करून कारवाई करावी, तसेच या मार्गावरील सर्व पुलाचे ऑडिट करण्याची मागणी त्यांनी केली.

# आसना पुलाजवळ ३० वर्षीय सचिन काळेचा खून, अवघ्या तासात ५ आरोपी ताब्यात

## दारू पिण्यासाठी बाहेर बोलावून कुऱ्हाडीने हत्या

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील सांगवी आसना पुलाजवळ कुऱ्हाडीने घाव घालून एका युवकाची निर्घृण हत्या केल्याची घटना शुक्रवार, दि. १० जुलै रोजी रात्री १०.३० वाजता घडली. प्रेम प्रकरणाच्या संशयातून ही हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी ५ संशयितांना काही तासांतच ताब्यात घेतले आहे.



नुरी चौक, नमस्कार चौक ते सांगवी दरम्यान राहणारा सचिन यशवंत काळे (वय ३० वर्षे) हा घरी होता. रात्री १०.३० च्या सुमारास काही युवकांनी दारू पिण्याच्या बहाण्याने त्याला घराबाहेर बोलावले. त्याला आसना पूल परिसरात नेले. तेथे जुन्या वादातून वादावादी झाली. यावेळी सोबतच्या ५ युवकांनी सचिनवर कुऱ्हाडीने मानेवर व डोक्यावर वार केले. गंभीर जखमी झालेल्या सचिनचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्यासह विमानतळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शी व स्थानिकांकडून माहिती घेत अवघ्या काही तासांतच ५ संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

# कुंडलवाडी पोलिसांची धाड; शेतशिवारातील तिर्रट जुगार अड्डा उद्ध्वस्त, ५७ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेंतर्गत कुंडलवाडी पोलिसांनी शेतशिवारातील तिर्रट जुगार अड्ड्यावर धाड टाकली. या कारवाईत ५७ हजार ८४० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून १२ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. १० जुलै रोजी सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे व त्यांचे पथक कुंडलवाडी पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करत असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे हुनगुंदा येथील शेतशिवारातील आखाड्यावर छापा टाकला.

पंचांसमक्ष टाकलेल्या छाप्यात तिर्रट नावाचा जुगार सुरू असताना आढळून आला. यावेळी १२ पैकी ९ आरोपींना जागीच ताब्यात घेण्यात आले. मात्र तिघेजण पोलीस दिसताच पसार झाले.

आरोपींकडून घटना-स्थळावरून पोलिसांनी १२ हजार ८४० रुपये रोख, ४५ हजार रुपयांचे सहा मोबाईल आणि जुगाराचे साहित्य असा ५७ हजार ८४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी एकूण १२ आरोपींविरुद्ध कुंडलवाडी पोलीस ठाण्यात गु.र.नं. ८१/२०२६, महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२(अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास कुंडलवाडी पोलीस करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ज्ञानेश्वर शिंदे, पोउपनि गजेंद्र मांजरमकर, गिरी, सपोउपनि पाटील, पोकॉ बोलमवाड, कल्याणकर, दस्तके यांच्या पथकाने केली.

पोलीस अधीक्षकांनी जिल्ह्यातील नागरिकांना अवैध जुगार, मटका, तिर्रट व इतर बेकायदेशीर धंद्यांची माहिती तत्काळ पोलिसांना देण्याचे आवाहन केले आहे.

# किनवट उपविभागात अवैध धंद्यांच्या उच्चाटनासाठी डीवायएसपींनी जारी केली हेल्पलाईन

**किनवट (प्रतिनिधी)–** किनवट उपविभागांतर्गत अवैध धंद्यांच्या समूळ उच्चाटनासाठी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी हेल्पलाईन नंबर जारी केल्याची माहिती गुरुवार, दि. ९ जुलै रोजी पत्रकार परिषदेत दिली.

किनवट उपविभागीय कार्यालयात उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून चंद्रशेखर कदम यांनी सूत्रे स्वीकारल्यानंतर पोलीस आणि पत्रकारांमध्ये समन्वय राखण्याच्यादृष्टीने त्यांनी बैठक घेतली. यावेळी बोलताना चंद्रशेखर कदम म्हणाले की, किनवट या दुर्गम भागात गावठी दारूची अवैध विक्री मोठ्या प्रमाणात केली जाते. शेजारील तेलंगणा राज्यातून शिंदीही आणून विकली जाते. गावठी दारू आणि शिंदी या दोन्हीही आरोग्यासाठी घातक आहेत. या व इतर अवैध धंद्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी किनवट उपविभागात पहिल्यांदाच तक्रारींसाठी ९९७५६७९७३३ या क्रमांकाची हेल्पलाईन नंबर सुरू करण्यात आली आहे. या हेल्पलाईन नंबरवर नागरिकांनी कोणत्याही अवैध धंद्यांसंदर्भातील माहिती कॉल, मेसेज अथवा व्हॉट्सॲप संदेशाद्वारे द्यावी, या क्रमांकावर पोलीस विभागाशी संबंधित तक्रार, निवेदन पीडीएफ किंवा निवेदनाचा साधा फोटोही पाठवावा. माहिती कळविणाऱ्याचे नाव, पत्ता तसेच मोबाईल क्रमांक गोपनीय ठेवण्यात येईल. सजग नागरिक हीच प्रशासनाची खरी ताकद असल्याने नागरिकांनी अवैध धंद्यांचा बिमोड करण्यासाठी वरील हेल्पलाईनचा वापर करावा, असेही आवाहन चंद्रशेखर कदम यांनी केले.

# जुगार अड्ड्यावर धाड; ७ आरोपींवर कारवाई करुन ५ लाखांचा मुद्देमाल जप्त, नांदेड ग्रामीण पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात अवैध व्यवसायांवर प्रभावी नियंत्रण मिळविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने नांदेड ग्रामीण पोलिसांनी अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून ७ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करत ५ लाख २ हजार ७२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



दि. १० जुलै रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना रामजीनगर, वसरणी येथील मोकळ्या जागेत काही व्यक्ती पैशाची हार-जीत लावून 'तिर्रट' नावाचा जुगार खेळत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार दोन पंचांच्या उपस्थितीत छापा टाकण्यात आला.

या कारवाईत दिगांबर माधवराव जटाळे (रा. वसरणी), श्याम हरिभाऊ मनाळकर (रा. वसरणी), गजानन भीमराव चव्हाण (रा. रुबी हॉटेलजवळ, सिडको), सचिन भागवत आहेर (रा. चौफाळा, नांदेड), शिलानंद पिराजी एडके (रा. वसरणी) तसेच दोन अनोळखी इसम असे ७ आरोपी जुगार खेळताना आढळून आले. आरोपींकडून ५ मोटारसायकल, ३ मोबाईल, नगदी व इतर जुगार साहित्य असा एकूण ५ लाख २ हजार ७२० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलीस स्टेशन नांदेड ग्रामीण येथे गुर. नं. ८५३/२०२६ अन्वये कलम १२ (अ), महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर, पोलीस उपनिरीक्षक, बाबुराव चव्हाण तसेच पोलीस अंमलदार कारामुंगे, जेंकुट, कदम, जाधव, सिरमलवार व शेख नेमणूक सर्व पोस्टे नांदेड ग्रामीण यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# चंदेरी

# हेमा मालिनी यांनी उघड केले अभिनयापासून दूर राहण्यामागचे कारण!

**हिंदी चित्रपटसृष्टीतील 'ड्रीम गर्ल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री हेमा मालिनी यांनी १९७० आणि १९८० च्या दशकात अनेक सुपरहिट चित्रपट दिले. 'शोले', 'सीता और गीता', 'ड्रीम गर्ल', 'सत्ते पे सत्ता' आणि 'बागबान'सारख्या चित्रपटांमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. मात्र, गेल्या काही वर्षांपासून त्या चित्रपटांपासून दूर आहेत. आता त्यांनी यामागचे कारण स्पष्ट केले आहे.**



भारतीय चित्रपटसृष्टीत काम करताना नुकतीच ६० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त दिलेल्या एका मुलाखतीत हेमा मालिनी यांनी सांगितले की, आजच्या चित्रपट निर्मितीच्या पद्धतीशी स्वतःला जुळवून घेणे त्यांच्यासाठी कठीण झाले आहे. त्यामुळेच त्यांनी अभिनयापासून अंतर ठेवले आहे. हेमा मालिनी म्हणाल्या, की मी ज्या काळात चित्रपटांमध्ये काम केले, तो भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ होता. त्या प्रवासाचा भाग होण्याचे भाग्य मला लाभले. त्या काळात विशेषतः महिलाकेंद्रित उत्कृष्ट चित्रपट तयार होत होते. सीता और गीता, सपनों का सौदागर, खुशबू यांसारख्या चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्य आहे. त्यांच्या मते, त्या काळातील कथा, संगीत आणि चित्रपट निर्मितीची शैली आजच्या तुलनेत पूर्णपणे वेगळी होती.

## आजच्या चित्रपटसृष्टीशी जुळवून घेणे कठीण...

चित्रपटांमध्ये काम न करण्यामागील कारण सांगताना त्या म्हणाल्या, की आज मी मागे वळून पाहते तेव्हा जाणवते की, मी जवळपास २०० चित्रपटांमध्ये काम केले आहे. अनेक निर्मात्यांनी मला वारंवार त्यांच्या चित्रपटांमध्ये संधी दिली. त्या काळात प्रत्येक चित्रपटात पाच-सहा गाणी असायची आणि हिट संगीताला मोठे महत्त्व होते. त्या पुढे म्हणाल्या, की आज चित्रपट बनवण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. अनेक जण मला विचारतात की मी आता चित्रपटांमध्ये का काम करत नाही. पण सध्याच्या चित्रपट निर्मितीच्या शैलीशी स्वतःला जुळवून घेणे माझ्यासाठी खूप अवघड आहे.

## 2007 नंतर कमी झाले चित्रपट...

हेमा मालिनी यांनी १९६८ मध्ये प्रदर्शित झालेल्या सपनों का सौदागर या चित्रपटातून अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी अनेक गाजलेल्या चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. २००७ नंतर त्यांनी अधूनमधून काही चित्रपट केले. २०११ नंतर २०१३, २०१६, २०१७ आणि २०२० मध्ये काही मोजके चित्रपट केल्यानंतर त्यांनी अभिनयापासून जवळपास पूर्णपणे दूर राहण्याचा निर्णय घेतला. सध्या हेमा मालिनी राजकारणात सक्रिय असून त्या खासदार म्हणून काम करत आहेत. भारतीय चित्रपटसृष्टीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना २००० साली पद्मश्री या देशाच्या चौथ्या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरविण्यात आले आहे.

# चेक बाऊन्स प्रकरणात राजपाल यादव यांना दिलासा नाही; दिल्ली उच्च न्यायालयाकडून 3 महिन्यांच्या तुरुंगवासाची शिक्षा कायम!

**चेक बाऊन्स प्रकरणात अभिनेता राजपाल यादव आणि त्यांची पत्नी राधा राजपाल यादव यांना मोठा धक्का बसला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांच्यावरील तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा कायम ठेवत कायदा कोणाच्याही सोयीप्रमाणे बदलत नाही, असे स्पष्ट शब्दांत सुनावले. हे प्रकरण मुरली प्रोजेक्ट्स प्रायव्हेट लिमिटेडसोबत झालेल्या आर्थिक व्यवहारातील अनेक धनादेश (चेक) अनादरित (बाऊन्स) झाल्याशी संबंधित आहे. न्यायालयाने या दाम्पत्याने दाखल केलेल्या २१ याचिका फेटाळून लावत, कनिष्ठ न्यायालय आणि सत्र न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याचे कोणतेही कारण नसल्याचे नमूद केले.**

न्यायमूर्ती स्वर्ण कांता शर्मा यांनी निरीक्षण नोंदवताना सांगितले की, न्यायालयाने अनेक वर्षे याचिकाकर्त्यांना पुरेशा संधी आणि सवलती दिल्या. मात्र, त्यांनी वारंवार न्यायालयात दिलेली आश्वासने पूर्ण करण्यात अपयश आले. सुनावणीदरम्यान राजपाल यादव यांनी तक्रारदाराशी तडजोड करण्याची इच्छा व्यक्त केली होती. त्यानंतर न्यायालयाने त्यांच्या शिक्षेला तात्पुरती स्थगिती दिली. तसेच पैसे उभे करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा मुदतवाढ मागितली आणि तक्रारदाराची संपूर्ण रक्कम परत करण्याचे आश्वासन स्वतः तसेच त्यांच्या वरिष्ठ वकिलामार्फत दिले. या आश्वासनांवर विश्वास ठेवून न्यायालयाने अनेकदा सुनावणी पुढे ढकलली. मात्र, दीर्घकाळ संधी मिळूनही त्यांनी दिलेली आश्वासने पूर्ण केली नाहीत. त्यामुळे अखेर त्यांना तुरुंग अधिकाऱ्यांसमोर आत्मसमर्पण करण्याचे निर्देश देण्यात आले. नंतर काही रक्कम भरल्यानंतर त्यांना काहीसा दिलासा मिळाला, परंतु दोन्ही पक्षांमध्ये अंतिम तडजोड होऊ शकली नाही. उच्च न्यायालयाच्या नोंदीनुसार, प्रकरणाला महत्त्वाचे वळण तेव्हा मिळाले, जेव्हा राजपाल यादव यांनी न्यायालयात स्पष्टपणे सांगितले की, ते तक्रारदाराला कोणतीही रक्कम देण्यास तयार नाहीत आणि पैसे परत करण्यापेक्षा पाच वेळा तुरुंगात जाणे पसंत करतील. या विधानावर न्यायालयाने कठोर शब्दांत प्रतिक्रिया व्यक्त केली. न्यायालयाने म्हटले की, एखादी व्यक्ती पैसे भरण्याऐवजी तुरुंगवास स्वीकारण्याचा निर्णय घेऊ शकते, परंतु त्यामुळे न्यायालयात दिलेली आश्वासने संपुष्टात येत नाहीत किंवा कायद्याचे स्वरूप बदलत नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, कायदा ही अशी पटकथा नाही की ती एखाद्या अभिनेत्याच्या इच्छेनुसार पुन्हा लिहिली जाईल. न्यायालये ठरलेल्या कायदेशीर तत्त्वांनुसार निर्णय देतात आणि प्रत्येक पक्षकाराकडून न्यायप्रक्रियेचा आदर अपेक्षित असतो.

# एकता कपूरला प्रेक्षकांची मानसिकता अचूक समजते

## ज्येष्ठ अभिनेत्री जयती भाटिया यांची विशेष मुलाखत

### आजवरच्या कारकिर्दीबाबत मनमोकळे भाष्य



**'कन्यादान', 'ससुराल सिमर का' आणि अलीकडील 'जाने अनजाने हम मिले' या मालिकांमधून घराघरात पोहोचलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री जयती भाटिया यांनी आपल्या तीन दशकांच्या अभिनयप्रवासातील संघर्ष, जुन्या काळातील चित्रीकरणाच्या अडचणी आणि आजच्या कारकिर्दीबाबत मनमोकळेपणाने भाष्य केले.**

जयती भाटिया सांगतात की, लहानपणापासूनच त्यांना कलेची आवड होती. त्यांनी शास्त्रीय नृत्याचे प्रशिक्षण घेतले आणि प्रसिद्ध रंगकर्मी इब्राहिम अल्काझी यांच्यासोबत चार वर्षे रंगभूमीवर काम केले. त्यानंतर त्यांचा प्रवास मुंबईकडे वळला. त्या म्हणाल्या, 'मुंबईत आल्यानंतर लवकरच मला समजले की माझ्या व्यक्तिमत्त्वामुळे मला चित्रपटांमध्ये नायिकेच्या भूमिका मिळणे कठीण आहे. त्यामुळे मी दूरचित्रवाणी मालिकांकडे वळले.' त्यांनी सांगितले की, सुरुवातीला त्यांची निवड एका मालिकेसाठी झाली होती, मात्र नंतर त्यांना वगळण्यात आले. त्यानंतर 'इतिहास' मालिकेद्वारे त्यांच्या दूरचित्रवाणी कारकिर्दीची सुरुवात झाली. पुढे 'कन्यादान'मध्ये नायिका, त्यानंतर खलनायिका, मग सासू आणि 'ससुराल सिमर का'मधील 'माताजी'सारख्या गाजलेल्या भूमिका त्यांनी साकारल्या.

## एकता अत्यंत दूरदृष्टीची...

एकता कपूरसोबतच्या सुरुवातीच्या दिवसांची आठवण सांगताना जयती म्हणाल्या, 'मला तिचे गॅरेजमधील छोटे ऑफिस आजही आठवते. जितेंद्र यांनी तिला वडील म्हणून पाठिंबा दिला, पण एकता नेहमीच वडिलांच्या पैशाचा योग्य वापर करण्याबाबत जागरूक होती. तिने दूरचित्रवाणी क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी खूप अभ्यास केला होता. प्रेक्षकांची मानसिकता तिला अचूक समजत होती, त्यामुळेच तिने निर्माण केलेली अनेक पात्रे आजही लोकांच्या लक्षात आहेत.' त्या हसत म्हणाल्या, 'अलीकडे एका कॅबचालकाने मला 'कन्यादान' मालिकेतील 'झुल्यावरची मुलगी' म्हणून ओळखले. त्या मालिकेला २६ वर्षे झाली, तरी लोक आजही मला लक्षात ठेवतात.'

## ठरवूनच स्वच्छतागृहात जायचो...

जुन्या चित्रीकरणाच्या दिवसांची आठवण सांगताना जयती भाटिया यांनी त्या काळातील कठीण परिस्थिती उलगडली. त्या म्हणाल्या, की आज चित्रीकरणाच्या ठिकाणी सुविधा खूप सुधारल्या आहेत. पण आमच्या काळात परिस्थिती अत्यंत कठीण होती. सात-आठ कलाकार एकाच मेकअप रूममध्ये बसत असत. त्या वेळी व्हॅनिटी व्हॅनची सोय नव्हती. फिल्मसिटीतील अनेक सेटवर स्वच्छतागृहच नव्हते. त्या पुढे म्हणाल्या, की स्वच्छतागृह कार्यालयाजवळ, सेटपासून खूप दूर असायचे. तिथे जाण्यासाठी बसने जावे लागायचे. त्यामुळे आम्ही सर्व अभिनेत्री वेळ ठरवून एकत्रच स्वच्छतागृहात जायचो. अनेकदा तासनतास जावेच लागत नसे. दुर्गंधीपासून बचाव करण्यासाठी माझ्याकडे नेहमी एअर फ्रेशनर असायचा.

» 'माताजी'ची भूमिका सुरुवातीला नाकारली होती... : 'ससुराल सिमर का'मधील 'माताजी' या लोकप्रिय भूमिकेबद्दल जयती म्हणाल्या, 'सुरुवातीला मी ही भूमिका करण्यास नकार दिला होता. त्या वेळी माझे वय ३९ वर्षे होते, पण पडद्यावर ६५ वर्षांच्या महिलेची भूमिका करायची होती. मी मालिकेतील मोठ्या सुनेच्या भूमिकेसाठी गेले होते. मात्र निर्मात्यांनी एकदा लूक टेस्ट देण्याचा आग्रह धरला.' त्या पुढे म्हणाल्या, 'वाहिनीच्या प्रमुखांनी मला ही भूमिका आयकॉनिक ठरेल असे सांगितले. सुरुवातीला अनिच्छेने स्वीकारलेली ही भूमिका दोन महिन्यांतच माझी ओळख बनली. सेटवर सगळे मला 'माताजी' म्हणू लागले आणि प्रेक्षकांनीही त्या भूमिकेवर भरभरून प्रेम केले.'



» दीपिका कक्करशी जिव्हाळ्याचे नाते : 'ससुराल सिमर का'मधील सहकलाकार दीपिका कक्कर यांच्याशी आजही आपले घट्ट नाते असल्याचे जयती यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, 'दीपिकाने मला नेहमीच खूप प्रेम आणि आदर दिला. गंभीर आजाराशी झुंज देत असतानाही ती आणि शोएब माझ्या 'चटोरी जयती' या कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी आले. जवळपास अडीच तास त्यांनी माझ्यासोबत घालवले. मी तिच्याशी नियमित बोलते आणि ती लवकर पूर्णपणे बरी व्हावी, अशी प्रार्थना करते.'

» सलग पाच वर्षे नीट झोप मिळाली नाही : अत्यंत व्यस्त कामाच्या वेळापत्रकाबद्दल त्या म्हणाल्या, की २००३ ते २००८ या पाच वर्षांत मी एकाच वेळी चार-पाच मालिकांमध्ये काम करत होते. दिवसाचे १६-१७ तास चित्रीकरण सुरू असायचे. त्या काळात मला व्यवस्थित झोपही मिळाली नाही. शॉट्सच्या मधल्या दहा-पंधरा मिनिटांच्या विश्रांतीतच डुलकी घेऊन दिवस काढायचे.' त्यांच्या मते, 'तो काळ खूप कष्टाचा होता. पण त्या मेहनतीमुळेच मी कलाकार म्हणून घडले. त्याचबरोबर नाव, पैसा आणि आर्थिक स्थैर्यही मिळाले.'

» 'हीरामंडी'नंतर अपेक्षाभंग : अलीकडील काळाबद्दल बोलताना जयती भाटिया म्हणाल्या, 'हीरामंडी'मधील माझ्या भूमिकेचे सर्वांनी कौतुक केले. समीक्षकांनीही भरभरून प्रशंसा केली. त्यामुळे या मालिकेनंतर ओटीटीवर अनेक संधी मिळतील, अशी अपेक्षा होती. मात्र तसे झाले नाही. त्या पुढे म्हणाल्या, 'उलट मला दूरचित्रवाणीवरील जवळपास १२ भूमिकांसाठी नकार मिळाला. अनेक ऑडिशन्स दिल्या, पण एकही भूमिका मिळाली नाही. हा माझ्यासाठी मोठा धक्का होता.'

» वैयक्तिक आयुष्यातील कठीण काळ : जयती यांनी २०२२ मधील वैयक्तिक दुःखद प्रसंगाचाही उल्लेख केला. त्या म्हणाल्या, 'त्या काळात मी सतत चित्रीकरणात व्यस्त होते, तर माझ्या सासूबाई अतिदक्षता विभागात उपचार घेत होत्या. शूटिंगमुळे रजा घेणे शक्य नव्हते. पॅकअपनंतर मी रोज त्यांना भेटायला रुग्णालयात जायचे. एका सकाळी त्यांना भेटायला गेले तेव्हा माझ्या येण्याचीच त्या जणू वाट पाहत होत्या. माझी भेट झाल्यानंतर काही वेळातच त्यांचे निधन झाले. मी त्यांच्याशी खूप जवळची होते. त्यांच्या जाण्याने आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली.'

# प्रत्येक कलाकाराकडे पर्यायी उत्पन्नाचे साधन असणे गरजेचे : नेहा हरसोरा

**अल्पावधीतच दूरचित्रवाणी विश्वात स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारी अभिनेत्री नेहा हरसोरा सध्या 'उडने की आशा' या मालिकेतील 'सैली'च्या भूमिकेमुळे प्रेक्षकांची लाडकी बनली आहे. अवघ्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत 'अग्नि वायु', 'थोडा सा बादल थोड़ा सा पानी', 'राज महल', 'ध्रुव तारा' यांसारख्या मालिकांबरोबरच ओटीटीवरील 'स्टेट ऑफ सीज : टेंपल अटॅक' या वेब सिरीजमधूनही तिने आपली छाप पाडली आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत नेहाने शिक्षण, अभिनयातील संघर्ष, बहिण येशा हरसोरा आणि अभिनय क्षेत्रातील आव्हानांबद्दल मनमोकळेपणाने संवाद साधला.**

## येशा माझी सर्वात मोठी ताकद



नेहाची धाकटी बहीण येशा हरसोरा हिनेही अभिनय क्षेत्रात पदार्पण केले आहे. त्याबाबत नेहा म्हणाली, 'माझ्यासाठी ही स्पर्धा नसून अभिमानाची गोष्ट आहे. मी केलेल्या चुका तिला टाळता याव्यात यासाठी तिची मदत करू शकते आणि तिच्याकडूनही मला खूप काही शिकायला मिळते.' ती पुढे म्हणाली, 'येशा माझी सर्वात मोठी ताकद आहे. ती माझ्यासोबत नसती तर कदाचित माझ्यात इतका आत्मविश्वास नसता. लोक तिच्या कामाचे कौतुक करतात, तेव्हा मला खूप अभिमान वाटतो. एवढ्या कमी वयात तिने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.'

## शिक्षणाला नेहमीच पहिले प्राधान्य...

नेहा सांगते, की 'आमच्या कुटुंबासाठी शिक्षणाला सर्वाधिक महत्त्व आहे. लहानपणी मी अभिनेत्री बनेन, असा कधी विचारही केला नव्हता. त्यामुळे माझ्या आई-वडिलांनी आधी पदवी पूर्ण करण्याची अट घातली होती.' तिने वाणिज्य शाखेत पदवी (बी. कॉम.) पूर्ण केल्यानंतर इन्व्हेस्टमेंट बँकिंगचे प्रमाणपत्रही मिळवले. ती या क्षेत्रात करिअर करण्याच्या तयारीत असतानाच २०२१ मध्ये 'अग्नि वायु' मालिकेद्वारे तिला अभिनयाची पहिली मोठी संधी मिळाली. ती म्हणाली, 'अभिनयावर प्रेम बसले असले तरी शिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. आमचे क्षेत्र खूप अनिश्चित आहे. त्यामुळे प्रत्येक कलाकाराकडे पर्यायी उत्पन्नाचे साधन किंवा दुसरे एखादे कौशल्य असणे आवश्यक आहे. शिक्षण तुम्हाला कठीण काळात उभे राहण्याची ताकद देते.'

## ...तर कलाकार सिद्ध होत नाही!



बोल्ड भूमिका किंवा अंतरंग दृश्यांबाबत विचारलेल्या प्रश्नावर नेहा म्हणाली, 'प्रत्येक व्यक्तीचा स्वतःचा कम्फर्ट झोन असतो. माझ्यासाठी अभिनय ही सतत शिकण्याची प्रक्रिया आहे.' ती स्पष्टपणे म्हणाली, 'बोल्ड भूमिका किंवा आकर्षक प्रतिमा निर्माण केल्याशिवाय काम मिळत नाही किंवा कलाकार म्हणून ओळख मिळत नाही, असे मला वाटत नाही. अभिनय मी निवडला कारण त्यात मला सहजता वाटते.' नेहा पुढे म्हणाली, 'ज्या गोष्टी मी आत्मविश्वासाने करू शकते, त्यासाठी मी १५० टक्के मेहनत घेते. मात्र माझ्या कम्फर्ट झोनबाहेरील गोष्टी करताना मी प्रयत्न नक्की करेन, पण त्यात पूर्ण समाधानकारक काम होईलच, याची खात्री देता येत नाही. प्रकल्पाशी संबंधित कोणालाही निराश करायचे नाही.' तिने हेही स्पष्ट केले की, नवे पेहराव किंवा वेगळ्या शैलीतील भूमिका करण्यास ती घाबरत नाही. 'जर कथानकाच्या दृष्टीने एखादा बोल्ड सीन किंवा लूक आवश्यक असेल, तर त्याबाबत चर्चा करण्यास मी तयार आहे,' असेही ती म्हणाली.



## मराठी भूमिकेसाठी विशेष तयारी

मूळची गुजराती असलेल्या नेहाने 'उडने की आशा' या मालिकेत मराठी मुलीची भूमिका साकारली आहे. यासाठी तिने विशेष तयारी केल्याचे सांगितले. ती म्हणाली, 'माझी मातृभाषा गुजराती असली तरी माझा जन्म आणि शिक्षण मुंबईतच झाले. शाळेत मराठी शिकले होते, पण मराठी संस्कृतीचा जवळून अनुभव घेण्यासाठी मी माझ्या मानलेल्या भावाकडून अनेक गोष्टी जाणून घेतल्या.' ती पुढे म्हणाली, 'मराठी परंपरा, सण-उत्सव आणि संस्कृती समजून घेण्यासाठी मी प्रयत्न केले. मिसळपाव हा माझा आवडता पदार्थ आहे. मुंबईसारख्या विविधतेने नटलेल्या शहरात राहूनही या भूमिकेमुळे मराठी संस्कृती अधिक जवळून अनुभवण्याची संधी मिळाली.'

# डिसेंबरमध्ये टीम इंडियाचा नेपाळ दौरा; टी-२० मालिकेचे वेळापत्रक जाहीर

**मुंबई (प्रतिनिधी)** – भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आणि क्रिकेट असोसिएशन ऑफ नेपाळ यांनी द्विपक्षीय क्रिकेट संबंधांना आणखी बळ देणारा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. यानुसार इंडिया ए संघ यंदाच्या डिसेंबरमध्ये नेपाळ दौऱ्यावर जाणार असून, दोन्ही संघांमध्ये तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळवण्यात येणार आहे. शुक्रवारी उछ ने अधिकृत निवेदन जारी करत या मालिकेचे संपूर्ण वेळापत्रक जाहीर केले.

'सीएएन' चे अध्यक्ष चतुर बहादूर चंद, सचिव पारस खडका आणि सचिव देवजीत सैकिया यांच्यात झालेल्या बैठकीनंतर या मालिकेवर शिक्कामोर्तब करण्यात आले. सर्व सामने नेपाळमधील कीर्तिपूर येथील त्रिभुवन विद्यापीठाच्या टीयू इंटरनॅशनल क्रिकेट ग्राउंडवर खेळवले जाणार आहेत.

भारत विरुद्ध नेपाळ 'इंडिया ए' टी-२० मालिकेचं वेळापत्रक -९ डिसेंबर पहिला टी-२०, ११ डिसेंबर दुसरा टी-२०, १३ डिसेंबर तिसरा टी-२०

ही मालिका नेपाळ क्रिकेटसाठी मोठी संधी मानली जात आहे. 'इंडिया ए' संघात आयपीएलमध्ये चमक दाखवणारे अनेक युवा खेळाडू तसेच भारतीय वरिष्ठ संघासाठी खेळलेले काही अनुभवी क्रिकेटपटूही असण्याची शक्यता आहे. त्यामुळे नेपाळच्या खेळाडूंना उच्च दर्जाच्या प्रतिस्पर्ध्यांविरुद्ध खेळण्याचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे.

गेल्या काही वर्षांत नेपाळ क्रिकेटने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय प्रगती केली आहे. सलग दोन टी-२० विश्वचषकांसाठी पात्र ठरलेल्या नेपाळने २०२४ च्या स्पर्धेत विजय मिळवता आला नव्हता. मात्र, २०२६ च्या टी-२० विश्वचषकात त्यांनी दमदार पुनरागमन करत स्कॉटलंडचा पराभव केला. इतकंच नाही, तर इंग्लंडसारख्या बलाढ्य संघालाही त्यांनी कडवी झुंज दिली. अत्यंत रोमांचक सामन्यात नेपाळला केवळ ४ धावांनी पराभव स्वीकारावा लागला, पण त्यांच्या कामगिरीने क्रिकेटविश्वाचं लक्ष वेधून घेतलं.

# उष्णतेच्या विळख्यात भारतातील १४ शहरे

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – शहरातील सतत वाढत्या तापमानामुळे जागतिक स्तरावर चिंता व्यक्त होत आहे. यात देशातील १४ शहरांचा समावेश असून महाराष्ट्रातील दोन प्रमुख शहरांचाही समावेश आहे. विशेष जगात उष्णतेचा धोका असलेल्या शहरांमध्ये राज्यातील दोन शहरे असून एक तर दिवसाच्या उष्णतेनंतर, सह्याद्रीच्या पर्वतरांगांमुळे संध्याकाळी थंड वाऱ्यामुळे आल्हाददायक वातावरणासाठी प्रसिद्ध आहे.जगातील २०५ सर्वात मोठ्या शहरांच्या विश्लेषणानुसार भारत, पाकिस्तान, नायजेरिया आणि घाना या देशांमध्ये तीव्र उष्णतेच्या धोक्याची सर्वाधिक शहरे आहेत.

सर्वाधिक धोकादायक ५० शहरांच्या यादीत जयपूरसारखी प्रमुख पर्यटनस्थळे आणि आंतरराष्ट्रीय व्यापार केंद्रांचाही समावेश असल्याचे अभ्यासातून समोर आले आहे. ५० सर्वाधिक धोकादायक शहरांमध्ये भारतातील १४ शहरांचा समावेश असून, त्यात महाराष्ट्रातील नागपूर आणि पुणे, तामिळनाडूतील मदुराई आणि चेन्नई, कर्नाटकमधील बंगळुरू, तसेच उत्तर प्रदेशातील कानपूर आणि लखनौ यांचा समावेश आहे. सर्वाधिक धोक्याची ९५ टक्क्यांहून अधिक शहरे दक्षिण, आग्नेय आशिया आणि सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकन प्रदेशात आहेत. या अभ्यासात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या शहरांचे विश्लेषण करण्यात आले. नागरिकांचे वय, आर्थिक स्थिती, वातानुकूलन सुविधा, तसेच झाडे आणि हरित क्षेत्र यांसारख्या नैसर्गिक संरक्षण व्यवस्थेचा विचार करून उष्णतेच्या धोक्याचे मूल्यांकन करण्यात आले.

## सी.एल.सी. हरवली आहे

माझी नवलकुमार रामदेव पोतदार या नावाची बीएस्सी पासची टी.सी. रेल्वे कॉलनी ते रेल्वे स्टेशन प्रवासात हरवली आहे. तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावे.

**संपर्क:**
**नवलकुमार रामदेव पोतदार रा. रेल्वे कॉलनी, हिंगोली गेट, नांदेड**

## टी.सी. हरवली

माझी शिल्पाताई नानासाहेब फडके रा. नरसी ता.नायगाव जि.नांदेड या नावाची १२ वी विज्ञान पासची टी.सी. नरसी ते नांदेड बस प्रवासात हरवली आहे. कुणाला सापडल्यास खालील पत्यावर संपर्क करावा.

**संपर्क पत्ता – शिल्पाताई नानासाहेब फडके रा. नरसी ता.नायगाव खै जि. नांदेड मो. ७६६६१२३०५३**

## जाहीर प्रगटन

तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार सुधाकर पिता नागोराव भरांडे रा. बामणी (बु) ता.बिलोली जि. नांदेड यांनी **स.उमर पिता स.हैदर पटेल** रा.बेळकोणी (बु.) बिलोली ता.बिलोली जि.नांदेड सध्या रा.देशमुख नगर,बिलोली ता.बिलोली जि.नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील स्थित मौजे बिलोली ता.बिलोली जि.नांदेड हद्दीतील न.प. मालमत्ता क्र. ३४५१ सर्व्हे क्र. ११७ मधील प्लॉट क्र. १०१ लांबी पुर्व-पश्चिम १२ मीटर व रुंदी – दक्षिण- उत्तर ०९ मीटर असे एकुण क्षेत्रफळ १०८ चौ.मी.प्लॉटची चर्तुसिमा **पुर्वेस**- १२ मी. रोड **पश्चिमेस** – प्लॉट क्र. ९५ चा भाग, **दक्षिणेस**- प्लॉट क्र. १०२ कोपरे यांचा, **उत्तरेस** - प्लॉट क्र. १०० नजीरसेठ यांचा सदरील प्लॉट माझे पक्षकार खरेदी करण्याचा करारनामा/ सौदा केला असून बयाना म्हणून काही रक्कम दिली आहे. तमाम जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वर वर्णन केलेल्या प्लॉटच्या खरेदी /विक्री बद्दल कोणाचा काही हक्क, कुळ, उजर, दावा, आक्षेप, तारण, जुना खरेदी विक्रीव्यवहार, सरकारी किंवा निमसरकारी बोजा व इतर काही हितसंबंध कोणास काही असल्यास त्यांनी आपला उजर / आक्षेप हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १० दिवसाच्या आत लेखी कागदोपत्री पुराव्यासह माझ्या कार्यालयात नोंदवावा. मुदतीत आक्षेप न आल्यास माझे पक्षकार वरील वर्णन केलेल्या प्लॉटचा व्यवहार तथा प्लॉटचे खरेदी खत करण्यात येईल. मुदतीनंतर आलेल्या उजर / आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही.

**करीता हे जाहीर प्रगटन.**

**दिनांक १०/०७/२०२६** — **जाहीर प्रगटन देणार**

मार्फत- **ॲड. विठ्ठल एम.जेठे**
कार्यालय- रा.दगडापूर (विजयनगर)
ता.बिलोली जि.नांदेड
मोबाईल क्र. ७९७२६२४२२३

सुधाकर पिता नागोराव भरांडे
रा. बामणी (बु) ता.बिलोली
जि. नांदेड
मोबाईल क्र. ९१५८२९७६३६

## तहसिलदार तथा दंडाधिकारी नायगाव (खै.) याचे न्यायालयात

**प्रकरण – जन्म/मृत्यू नोंद घेणे बाबत**
**अर्ज क्र. ४५३/२०२६**
**जाहिर प्रगटन**

विषय :- जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम सुधारित, आणि जन्म व मृत्यू नोंदणी १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्माची नोंद घेणेसाठी आदेश देण्याबाबतचे जाहिर प्रगटन.

संदर्भ – अर्जदार श्री मारोती ग्यानोबा जंगले रा. रानमुगाव ता. नायगाव (खै.) जि. नांदेड यांचा अर्ज दि.२४/१२/२०२५

ज्याअर्थी अर्जदार श्री. मारोती ग्यानोबा जंगले रा. रानसुगाव ता. नायगाव (खै.) जि.नांदेड यांचा अर्ज दि. २४/१२/२०२५ अर्जदार यांची मुलगी अनुजा मारोती जंगले यांचा जन्म दि. ०५/०२/२०२३ रोजीची जन्म नोंद आदेश मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच अर्जदार यांनी ग्रामीण रुग्णालय नायगाव ता नायगांव (खै.) जि. नादेड येथे जन्मामृत्यू दाखल्याची मागणी अर्ज दिला असता संबधित उपनिबंधक जन्म/मृत्यू नोंद ग्रामीण रुग्णालय नायगाव ता. नायगांव (खै.) जि. नांदेड येथे जन्म/मृत्यू नोंद अधिनियम १९६९ च्या कलम १० अन्वये नमुना १० अन्वये नोंद नसल्याचे लेखी अनुपलब्धता प्रमाणपत्र दि. २४/१२/२०२५ रोजीचे अर्जासोबत सादर कलेले आहे.

त्याअर्थी, अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम २०२३ (सुधारीत) आणि कलम १३ (३) नुसार जन्म/मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ अन्वये अर्जदार यांची मुलगी अनुजा मारोती जंगले यांचा जन्म दि.०५/०२/२०२३ जन्माची नोंद घेण्यासाठी ग्रामीण रुग्णालय नायगांव ता.नायगाव (खै.) जि. नांदेड यांना जन्म नोंद घेण्यासाठी आदेश देण्याबाबत विनंती केली आहे. त्याअनुषंगाने अर्जदार यांची जन्माची खात्री करण्यासाठी या जाहिर प्रगटनाव्दारे वर्तमानपत्रात प्रसीध्दी करण्यात येत आहे. जर कोणाचा आक्षेप किंवा उजर असेल तर त्यांनी तहसिलदार तथा तालूका दंडाधिकारी नायगांव (खै.) यांचे न्यायालयात जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत सादर करावा अन्यथा कोणताही आक्षेप नाही, असे गृहीत धरुन अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०७/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी या न्यायालयाच्या शिक्यासंह देण्यात येते.

**तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी**
**नायगाव (खै.)**

## Change In Name

My Old Name is **ABDUL HAMEED** which now I am changing as New Name **MOHAMMAD ABDUL HAMID.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Mohammad Abdul Hamid**
**15397, Labour Colony, At.Post. Shivajinagar**
**Dist. Nanded Shivaji Nagar Po. Shivaji Nagar**
**Dist. Nanded Maharashtra 431602**

## Change In Name

My old name is **SHRIN BEGUM KHALEEL AHAMAD** which now I am Changing as new Name. **SHIREEN BEGUM KHALEEL AHAMAD.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Adddress - H.No. 2-5-136/1, Khadakpura
Main Road Nanded, J.K. Electricals Khadakpura
Nanded 431601

## Change In Name

My Old Name is **SYEDA NIKHAT SABA** which now I am changing as New Name **NIKHAT SABA.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Mohammad Abdul Hamid**
**15397, Labour Colony, At.Post. Shivajinagar**
**Dist. Nanded Shivaji Nagar Po. Shivaji Nagar**
**Dist. Nanded Maharashtra 431602**

## Change In Name

My Old Name is **ABDUL RAHIM** which now I am changing as New Name **MOHAMMAD ABDUL RAHIM MOHAMMAD ABDUL HAMID.** Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

**Address - Mohammad Abdul Hamid**
**15397, Labour Colony, At.Post. Shivajinagar**
**Dist. Nanded Shivaji Nagar Po. Shivaji Nagar**
**Dist. Nanded Maharashtra 431602**

## Change In Name


My old name is **ABDUL SATTAR SK AHAMAD** which now I am Changing as new Name. **ABDUL SATTAR.** Hence forth my all correspondence Will be done as pes my new name. Please consider, the same.

Address - H.No. 2-5-136/1, Khadakpura
Main Road Nanded, J.K. Electricals
Khadakpura Nanded 431601

## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



आदिवाशी शिक्षण विकास प्रसारक मंडळ संचलित

# शिवप्रसाद अध्यापक विद्यालय, मुखेड

NCTE Code No: WRC/2-32/122866/2008

**डी.एल.एड प्रवेश (2026-27)**
**मराठी माध्यम (20 व्यवस्थापन कोटा प्रवेशासाठी)**

सन 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी फक्त खाजगी विनाअनुदानित अध्यापक विद्यालय, मुखेड डी.एल.एड प्रथम वर्ष नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेशपात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

- **ऑनलाईन अर्ज सादर करणे** : 08/07/2026 (सकाळी 11. वा) ते 12/07/2026 (मध्यरात्री 12 वाजेपर्यंत)
- विद्यार्थ्यांना अध्यापक विद्यालयाच्या लॉगिन मध्ये समाविष्ठ करुन घेण : 08/07/2026 (सकाळी 11 वा) ते 14/07/2026 (मध्यरात्री 6 वाजेपर्यंत) सकाळी 10.00 ते सांयकाळी 06.00 वाजेपर्यंत
- **प्रवेश अर्ज शुल्क** : 200/- रुपये ओपन व मागासवर्गीयासाठी 100/- रु (जातीचे प्रमाणपत्र सोबत आणावे)
- **शैक्षणिक पात्रता** : खुलया संवर्गातील उमेदवारास 12 वीत किमान 49.5 टक्के गुणासह उत्तीर्ण व मागासवर्गीय उमेदवारास 12 वीत किमान 44.5 टक्के गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- **शाखा निहाय आरक्षण** : विज्ञान-50 टक्के, कला-40 टक्के, वाणिज्य-09 टक्के व व्होकेशनल-01 टक्के

| प्रवेश प्रकार | विज्ञान | कला | वाणिज्य व व्हाकेशनल | एकुण |
|---|---|---|---|---|
| व्यवस्थापन कोटा | 5 | 4 | 1 | 10 |

- **वैधानिक आरक्षण** : एस.सी.एस.टी- 2, व्हीजेएनटी- 1 , एस.बी.सी, ओ.बी.सी- 2 ओपन- 5
- एस.टी संवर्गातील उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र व व्हीजेएनटी, एस.बी.सी, ओ.बी.सी यांना नॉलक्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रवेशासाठी आवश्यक आहे.
- **सामाजिक आरक्षण** : प्रकल्पग्रस्त, अपंग, माजी सैनिक, आजी सैनिक, स्वांतत्र सैनिक, घटस्फोटीत, विधवा, अनाथ, महिला या सामाजिक आरक्षणातुन एक जागा भरली जाईल.
- **नोट** : व्होकेशनल शाखेसाठी वाणिज्य शाखेतुन एकुण जागेपैकी 01 टक्का जागा राहिल (फक्त कृषी गटातील हॉर्टीकल्चर व क्रॉप सायन्स व आरोग्य व वैद्यकीय सेवागटातील केब आणि प्रिस्कुल मॅनेजमेट हे विषय घेतलेले व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीटाची (FYBA) इंगजी विषयी घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच प्रवेशास पात्र असतील)
- टिप : शासन नियमानुसार घटनात्मक, सामाजिक, वैधानिक, शाखानिहाय, उपलबधतेनुसार पाळले जाईल.

एज्युकेशन सोसायटी नायगांव बा. संचलित

# अध्यापक विद्यालय, नायगांव बा ता.नायगांव जि.नांदेड

NCTE Code No : WRC/2-32/1221186/69/2005/1499

**डी.एल.एड प्रवेश (2026-27)**
**मराठी माध्यम (20 व्यवस्थापन कोटा प्रवेशासाठी)**

सन 2026-27 या शैक्षणिक वर्षासाठी फक्त खाजगी विनाअनुदानित अध्यापक विद्यालय, नायगांव बा डी.एल.एड प्रथम वर्ष नियमित अभ्यासक्रमासाठी प्रवेशपात्र उमेदवाराकडुन अर्ज मागविण्यात येत आहे.

- **ऑनलाईन अर्ज सादर करणे** : 08/07/2026 (सकाळी 11. वा) ते 12/07/2026 (मध्यरात्री 12 वाजेपर्यंत)
- विद्यार्थ्यांना अध्यापक विद्यालयाच्या लॉगिन मध्ये समाविष्ठ करुन घेण : 08/07/2026 (सकाळी 11 वा) ते 14/07/2026 (मध्यरात्री 6 वाजेपर्यंत) सकाळी 10.00 ते सांयकाळी 06.00 वाजेपर्यंत
- **प्रवेश अर्ज शुल्क** : 200/- रुपये ओपन व मागासवर्गीयासाठी 100/- रु (जातीचे प्रमाणपत्र सोबत आणावे)
- **शैक्षणिक पात्रता** : खुलया संवर्गातील उमेदवारास 12 वीत किमान 49.5 टक्के गुणासह उत्तीर्ण व मागासवर्गीय उमेदवारास 12 वीत किमान 44.5 टक्के गुणासह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
- **शाखा निहाय आरक्षण** : विज्ञान-50 टक्के, कला-40 टक्के, वाणिज्य-09 टक्के व व्होकेशनल-01 टक्के

| प्रवेश प्रकार | विज्ञान | कला | वाणिज्य व व्हाकेशनल | एकुण |
|---|---|---|---|---|
| व्यवस्थापन कोटा | 10 | 08 | 02 | 20 |

- **वैधानिक आरक्षण** : एस.सी.एस.टी-04, व्हीजेएनटी-02, एस.बी.सी, ओ.बी.सी-04, ओपन-10
- एस.टी संवर्गातील उमेदवाराला जात वैधता प्रमाणपत्र व व्हीजेएनटी, एस.बी.सी, ओ.बी.सी यांना नॉलक्रिमीलेयर प्रमाणपत्र प्रवेशासाठी आवश्यक आहे.
- **सामाजिक आरक्षण** : प्रकल्पग्रस्त, अपंग, माजी सैनिक, आजी सैनिक, स्वांतत्र सैनिक, घटस्फोटीत, विधवा, अनाथ, महिला या सामाजिक आरक्षणातुन एक जागा भरली जाईल.
- **नोट** : व्होकेशनल शाखेसाठी वाणिज्य शाखेतुन एकुण जागेपैकी 01 टक्का जागा राहिल (फक्त कृषी गटातील हॉर्टीकल्चर व क्रॉप सायन्स व आरोग्य व वैद्यकीय सेवागटातील केब आणि प्रिस्कुल मॅनेजमेट हे विषय घेतलेले व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीटाची (FYBA) इंगजी विषयी घेऊन उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच प्रवेशास पात्र असतील)
- टिप : शासन नियमानुसार घटनात्मक, सामाजिक, वैधानिक, शाखानिहाय, उपलबधतेनुसार पाळले जाईल.

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९७०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




## पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांची किनवटला भेट



**किनवट (प्रतिनिधी)-** जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी शनिवार, दि. ११ जुलै रोजी किनवट पोलीस ठाण्याला भेट दिली. तासभराच्या भेटीत त्यांनी किनवट उपविभागांतर्गत कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला.

किनवट पोलीस ठाण्याला दिलेल्या या भेटीदरम्यान डॉ. निलाभ रोहन यांनी ठाण्याच्या संपूर्ण इमारतीची तसेच विविध दालनांची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्थेचा आढावा घेतला. ठाण्यांतर्गत मटका, गुटखा, जुगार, वाळू उपसा आदी अवैध धंद्यांविरुद्ध कडक पावले उचलण्याचे आदेश दिले आहेत. पोलीस ठाण्यातील नोंदी, प्रलंबित गुन्हे, आणि दैनंदिन कामकाजाच्या दप्तराची त्यांनी पाहणी केली. त्यानंतर त्यांनी सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन विचारपूस केली.


शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा पत्रकारांकडूनही आढावा घेतला. अवैध धंदे, धार्मिक सलोखा तसेच गुन्हेगारीबाबत चर्चा केली. किनवट पोलीस ठाण्यात आवश्यक तेवढे मनुष्यबळ पुरविण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम, सहायक पोलीस निरीक्षक प्रल्हाद जाधव, संजय चव्हाण, पोलीस उपनिरीक्षक फडेवार, लेनगुळे उपस्थित होते. किनवटनंतर जिल्हा पोलीस अधीक्षक मांडवी, सिंदखेडकडे रवाना झाले.




















**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com